आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर
वाचा एका क्लिकवर
www.dainiklaturprabhat.in





# दैनिक लातूर प्रभात

E-mail :- laturprabhat@gmail.com

मुख्य संपादक : रघुनाथ बनसोडे मो.नं.८८३०२ ५०६४५,

RNI No.: - MAHMAR/2017/72894 ● वर्ष ०७ वे ● अंक ३२४ वा ● शुक्रवार दि. १७ मे २०२४ ● किंमत २ रूपया ● पाने ४ ●


## अकरावीच्या विद्यार्थिनीचे वडिलांच्या मित्रासोबत पलायन; अपहरणकर्त्याला गोंदियातून अटक

नागपूर : वडिलासोबत कामावर सहकारी मजूर असलेल्या व्यक्तीचे घरी येणे-जाणे होते. दरम्यान, त्याच्याशी मुलीची ओळख झाली. काही दिवसांतच अकरावीत शिकणाऱ्या मुलीला तो आवडायला लागला. दोघांनीही प्रेमविवाह करण्यासाठी घरातून पळ काढला. मध्यप्रदेशात पळून जाण्याच्या तयारीत असलेल्या दोघांनाही गुन्हे शाखेच्या पथकाने गोंदियातून ताब्यात घेतले. मुलीला आईवडिलांच्या ताब्यात देण्यात आले असून आरोपी व्यक्तीला प्रतापनगर पोलिसांच्या ताब्यात दिले आहे. आरोपी सोन्या हा मूळचा रामटेकचा रहिवासी आहे. कामधंद्याच्या शोधात तो नागपुरात आला. तर अपहृत कविता (काल्पनिक नाव) हिचे कुटुंब मूळचे मध्यप्रदेशातील असून, तेसुद्धा कामाच्या शोधात नागपुरात आले. कविताला आई-वडील आणि एक भाऊ आहे. सोन्या हा एका बांधकाम ठेकेदाराकडे कामाला लागला. तेथेच कविताचे वडिलही काम करीत होते. सोबत कामाला असल्यामुळे दोघांची मैत्री झाली. सोन्याला जेवन करायला घरी आला. त्यावेळी त्याची ओळख मित्राची मुलगी कविताशी झाली. त्यानंतर तो अनेकदा घरी आला. यादरम्यान, कविता आणि सोन्याची मैत्री झाली. दोघांत प्रेमसंबंध निर्माण झाले. त्यावेळी ती दहावीत होती.

## शिवणी व शिवणखेडमध्ये बिबट्या सदृश्य प्राणी; सतर्क राहण्याचे आवाहन

लातूर, : चाकूर ताल्युक्यातील शिवणी, शिवणखेडमध्ये बिबट्या सदृश्य प्राण्याचा वावर आढळून आला आहे. खबरदारीचा उपाय म्हणून याठिकाणी वन कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. तरी ग्रामस्थांनी सतर्क राहण्याचे आवाहन सहायक वनसंरक्षक वैशाली तांबे यांनी केले.

ग्रामस्थांनी शेतात रात्री मुक्काम करू नये. साथ सलोख्याचे नियम पाळून, चमूने, गटाने शेतकामास जावे. शेतात मोकळ्या जागेत मुक्काम करू नये, लहान मुलांना एकट्याने फिरू देऊ नये. जनावरांना बंदिस्त गोठ्यात अथवा निवाऱ्यात बांधावे. अफवांवर विश्र्वास ठेवू नये. बिबट्या सदृश्य प्राणी निदर्शनास आल्यास त्याची माहिती वन विभाग, सरपंच, पोलीस पाटील यांना कळवावे, असेही आवाहन त्यांनी केले आहे.

## संस्थापक-शिक्षकाच्या वादात लिपीकाची हत्या; गोंदियातील सिद्धार्थ विज्ञान महाविद्यालयातील घटना

गोंदिया : इतरांच्या वादात मध्यस्थी करणे किती महागात पडू शकते, हे देवरी तालुक्यातील डवकी येथील सिद्धार्थ विद्यालय तथा महाविद्यालयातील झालेल्या घटनेवरून देवरीकरांना अनुभवास आले. शाळा संस्थापक व शिक्षकाचा सुरू असलेला वाद शमविण्यासाठी मध्यस्थी करून पुढाकार घेर्णाया लिपीकाला जीव गमवावा लागला. वादात मध्यस्थी करर्णाया लिपीकालाच शिक्षकाने जब्बर मारहाण केली. मारहाणीत गंभीर जखमी झालेल्या लिपीकाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. ही घटना गुरूवार १६ मे रोजी उघडकीस आल्याने एकच खळबळ उडाली. मुकूंद बागडे (६०) रा. मुल्ला ता. देवरी असे मृतकाचे नाव आहे.

सविस्तर असे की, देवरी तालुक्यातील सिद्धार्थ विद्यालय तथा महाविद्यालय डवकी येथे १५ मे रोजी सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेत विविध विषयांवर चर्चा घडवून आणण्यात आली. दरम्यान संस्थेची सभा संपताच शिक्षक हिरालाल खोब्रागडे (५२) यांनी आपल्या समस्या उपस्थित करून संस्थापक असलेले मुख्याध्यापक महेंद्र मेश्राम यांना धारेवर धरले. यावरून संस्थापक मेश्राम आणि शिक्षक खोब्रागडे यांच्यात चांगलाच कलगीतुरा रंगला. पाहता पाहता शाब्दीक वाद विकोपाला गेला. तुमच्यामुळे माझ्या आयुष्याची वाट लागली, असा आरोप करीत शिक्षक खोब्रागडे यांनी मुख्याध्यापकांवर हल्लाबोल केला. दरम्यान मुकूंद बागडे हा समजुत घालण्याच्या उद्देशाने म ध्यस्थीसाठी गेला वाद अधिकच वाढत असल्याचे पाहून मुकूंद बागडे हा समजुत घालण्याच्या उद्देशाने मध्यस्थीसाठी गेला. मात्र खोब्रागडे यांनी रागाच्या भरात मुख्याध्यापकांना सोडून मुकुंदलाच जबर मारहाण केली. या घटनेत मुकूंद बागडे यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने तो जागीच बेशुध्द होवून पडला . बेशुध्द अवस्थेतच मुकुंद बागडे यांना प्रथम उपचारासाठी देवरी ग्रामीण रुग्णालयात हलविण्यात आले.

नंतर प्रकृती चिंताजनक असल्याने पुढील उपचारासाठी गोंदिया येथील एका खाजगी रुग्णालयामध्ये दाखल करण्यात आले. परंतु उपचारादरम्यान आज गुरुवारी १६ मे रोजी पहाटे ३ वाजतादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. या घटनेची नोंद देवरी पोलिस ठाण्यात करण्यात आली असून पोलिसांनी गुन्हा नोंद करून आरोपी हिरालाल खोब्रागडे ला अटक केली आहे. पुढील तपास पोलिस निरीक्षक प्रवीण डांगे करीत आहे. मृतक मुकुंद बागडे पंचशील विद्यालय तथा कनिष्ट महाविद्यालय मक्काटोला येथे लिपिक या पदावर कार्यरत होते. त्यानंतर समाजकार्यामध्ये पुढे राहून काँग्रेस या पक्षाचे सक्रिय कार्यकर्ते होते. त्यामुळेच वादविवाद न करता सामंजस्यांनी प्रश्न मिटावेत या उद्देशाने मुकुंद बागडे नी मध्यस्थी केली मात्र त्यांचा चांगुलपणा नडला आणि जीव गमवावा लागला मृतकाची पत्नी कल्पना बागडे मुल्ला ग्रामपंचायत येते सरपंच पदावर कार्यरत आहेत. मृतकाची मुलगी थायलंड येते शिक्षण घेत आहे. मृतकाच्या मागे एक मुलगा, एक मुलगी, पत्नी तसेच आप्तपरिवार आहे. अचानक झालेल्या हत्येमुळे देवरी तालुकात हळहळ व्यक्त केली जात आहे. शाळा, महाविद्यालय म्हटले तर, एका विद्यार्थ्याला ज्ञानदान, विद्यार्थ्यांचे भविष्य, समाज घडविण्याचे मंदिर असते. मात्र शिक्षण क्षेत्रात दिवसेंदिवस वाढत असलेली नेतागिरी फसवणूक लबाडी आणि गुन्हेगारी प्रवृत्तीमुळे शिक्षक आणि शिक्षणावरही लोकांचा विश्वास जास्त काळ टिकेल काय? हा प्रश्न या घटनेमुळे उपस्थित झाला आहे.




# दारूचा ट्रक लुटणारे ०४ आरोपी ७२ लाख रुपयांच्या मुद्देमालसह ७२ तासातच जेरबंद

**लातूर (पोअका) : अज्ञात चोरट्यांनी शस्त्राचा धाक दाखवून विदेशी मद्याची वाहतूक करणाऱ्या कंपनीचा ट्रक मध्ये बसलेल्या चालक व हेल्पर इतर दोन इसमांना मारहाण करून लुटल्याची घटना दिनांक १२ मे रोजी मध्यरात्री नागपूर तुळजापूर महामार्गावरील आष्टा येथील टोलनाक्याजवळ दोन वाहनातून आलेल्या काही घडली होती. ट्रक चालकाने दिलेल्या फिर्याद वरून पोलीस ठाणे चाकूर येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक २३५/२०२४ कलम ३९५, ३४१, ५०६ भादवी व ४, २५ शस्त्र अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.**

गुन्हा दाखल होताच पोलीस अधीक्षक सोमय मुंडे व अप्पर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे यांनी घटनास्थळास भेट देऊन पाहणी केली व गुन्ह्याच्या तपासकामी स्थानिक गुन्हे शाखेचे व पोलीस ठाणे चाकूर येथील पोलीस अधिकारी अमलदारांचे विविध पथके तयार करून त्यांना मार्गदर्शन व सूचना देऊन विविध ठिकाणी तात्काळ रवाना करण्यात आले.

दरम्यान स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीस पथकाने बीड, धाराशिव, सोलापूर व कर्नाटक राज्यातील गुलबर्गा येथे तपास करून सदर पद्धतीचे गुन्हे करणाऱ्या सराईत आरोपींना



ताब्यात घेऊन विचारपूस करून, तांत्रिक व गोपनीय माहितीच्या आधारे गुन्ह्यातील अज्ञात आरोपींना निष्पन्न करून त्यांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून गुन्ह्यात चोरलेला विदेशी दारूचे ९०० बॉक्स व ट्रक असा एकूण ७२ लक्ष रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदरची कारवाई वरिष्ठांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांचे नेतृत्वात सहाय्यक पोलीस निरीक्षक विश्र्वंभर पल्लेवाड, सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण राठोड, पोलीस उपनिरीक्षक संजय भोसले, पोलीस अमलदार रियाज सौदागर, राजेश कंचे, योगेश गायकवाड, प्रदीप स्वामी, राहुल कांबळे, रामहरी भोसले, मनोज खोसे, खुर्रम काझी, राहुल सोनकांबळे, साहेबराव हाके, दीनानाथ देवकते, रवी गोंदकर, तुराब पठाण, नितीन कटारे,मोहन सुरवसे, संतोष खांडेकर, चालक पोलिस अमलदार नकुल पाटील, सचिन मुंडे, प्रदीप चोपणे, चंद्रकांत केंद्रे, व्यंकट निटुरे, सायबर सेल चे सहाय्यक पोलीस निरीक्षक नलिनी गावडे, पोलिस अमलदार संतोष देवडे, गणेश साठे, शैलेश सुडे, केली आहे.

## मतमोजणीसाठी नियुक्त अधिकारी, कर्मचाऱ्यांनी आपली जबाबदारी अचूकपणे पार पाडावी- जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे

लातूर, (जिमाका) : लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ करिता लातूर लोकसभा मतदारसंघात ७ मे रोजी मतदान झाले असून शहरातील शासकीय महिला निवासी तंत्रनिकेतन येथे ४ जून २०२४ रोजी मतमोजणी होणार आहे. यासाठी विविध पथके गठीत करण्यात आली असून प्रत्येक पथकातील अधिकारी, कर्मचारी यांनी आपली जबाबदारी अचूकपणे पार पाडावी, अशा सूचना जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात बुधवारी झालेल्या बैठकीत दिल्या. प्रभारी अपर जिल्हाधिकारी तथा उपजिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. भारत कदम, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, उपजिल्हाधिकारी नितीन वाघमारे, अहिल्या गाठाळ, लातूरच्या उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे, जिल्हा कोषागार अधिकारी उज्ज्वला पाटील, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक कल्पना क्षीरसागर, नगरपालिका प्रशासनचे जिल्हा सहआयुक्त रामदास कोकरे, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी आशुतोष बारकुल, जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी जावेद शेख, जिल्हा उद्योग केंद्राचे प्रकल्प संचालक प्रवीण खडके, तहसीलदार सौदागर तांदळे यावेळी उपस्थित होते. मतमोजणी प्रक्रिया सुरळीत आणि अचूकपणे पार पाडण्यासाठी विविध पथके गठीत करण्यात आली आहेत. या पथकांमध्ये नियुक्त अधिकाऱ्यांनी आपल्यावर सोपविलेल्या जबाबदारीच्या अनुषंगाने भारत निवडणूक आयोगाने निर्गमित केलेल्या नियमांचा अभ्यास करून त्यादृष्टीने पूर्वतयारी करावी. मतमोजणी दिवशी कोणत्याही प्रकारे चूक होवू नये, यासाठी आतापासूनच खबरदारी घेणे आवश्यक आहे. मतमोजणी कक्षातील बैठक व्यवस्था, मतमोजणीसाठीचे टेबल, ध्वनिक्षेपक यंत्रणा आदी सर्व सुविधा उपलब्ध करून देण्याची कार्यवाही विहित कालावधीत पूर्ण करावी, अशा सूचना जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी दिल्या.

## लातूर शहर अतीक्रमणाच्या विळख्यात; तरीही सुजलाम सुफलाम कसे ?

*लातूर/लातूर हे विकसित शहर, शैक्षणिक क्षेत्राचे माहेर घर, कायदा शांतता व सुव्यवस्थेचे केंद्रबिंदू असताना लातूर शहरातील हरेक गल्ली, चौक अतिक्रमणाच्या विळख्यात कसा काय असा संशयित सवाल लातूर शहरातील सर्वसामान्य जनतेतून चर्चिला जातो आहे.*

*लातूर हे नगरपालिके अंतर्गत होते तेव्हापासूनच अतिक्रमण होत गेले आहे त्यात लातूर महानगरपालिका कार्यरत झाल्यापासून शहरातील हमरस्त्यावरील व्यापारी संकुल, दुकानासमोरे दुय्यम भाडेकरू ठेवून रस्त्यावर अतिक्रमण केलेले दिसते, त्याकडे लातूर महानगरपालिकेचे दुर्लक्ष असल्याचे दिसते. शहरी भागात ज्या कोणा हम रस्त्यावरील दुकानदार-व्यापारी यांना पायवाट ठेवणे बंधनकारक असते पण ती पाय वायवाटच अतिक्रमणाच्या विळख्यात असल्याचे लातूर महानगरपालिकेचे आयुक्त-प्रशासक बाबासाहेब मनोहरे काय करतात अशी विचारणा होताना दिसते आहे.*

*लातूर शहरातील राजीव गांधी चौक, गांधी चौक, विवेकानंद चौक, बसवेश्र्वर चौक येथील मनपाची राखीव जागा ही अतिक्रमनाने वेढली आहे. त्याकडे मनपा आयुक्ताचे दुर्लक्ष कसे अशीही उलट सुलट कुजबूज होताना दिसते आहे.*

*लातूर शहर विकसित-सुजलाम-सुपलाम व्हावे या हेतूने तात्कालीन दिवंगत मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी आटोकाट प्रयत्न केले ते यशस्वी झाले. परंतु त्याचीच काँग्रेसची पिळावळ लातूरच्या विकासाला खीळ घालून अतिक्रमणाच्या नावाखाली लातूरलाच बंदिस्त करीत असल्याने लातूरच्या विकासाला आड येणाऱ्या अधिकारी-कर्मचारी यांना आळा घालावा अशी मागणी होत असून, लातूर शहरातील रस्त्यावर-ग्रीन बेल्ट वर, खाजगी मनपा च्या मालमत्तेवर टाच मारून अतिक्रमण करणाऱ्याच्या विरोधात कठोर कारवाई करावी अशी मागणी होताना दिसते आहे.*

## बुलढाण्यात परिचारिकेवर अत्याचार; बदनामीची धमकी देत

बुलढाणा : बुलढाणा शहरातील खासगी रुग्णालयात काम करणाऱ्या ३२ वर्षीय परिचारिकेवर २३ वर्षीय तरुणाने अत्याचार केल्याचा संतापजनक प्रकार समोर आला आहे. त्याने वेळोवेळी धमक्या देत तिच्या अब्रूचे लचके तोडले. याप्रकरणाची तक्रार पीडितेने बुलढाणा शहर पोलीस ठाण्यात दिली असून पोलिसांनी परिचारक असलेल्या २३ वर्षे तरुणावर अट्रोसिटीसह विविध कलम ानुसार गुन्हा दाखल केला आहे.

विशाल गजानन बोराडे ( रा.जुनागाव) असे या वासनांध तरुणाचे नाव असून तोदेखील एका खासगी रुग्णालयात परिचारक म्हणून नोकरी करतो. पीडित नर्स बुलडाणा शहरातीलच राहणारी आहे. ती आणि आरोपी विशाल २०२१ मध्ये शहरातील जांभरुन मार्गावरील एका खासगी रुग्णालयात नोकरीला होते. तिथेच दोघांची ओळख आणि त्यातून मैत्री झाली. त्यानंतर दोघांचे एकमेकांच्या घरी येणे जाणे देखील सुरू झाले. पुढील काळात विशालने तिच्या इच्छेविरुद्ध तिच्याशी शारीरिक संबंध प्रस्थापित केले. वेगवेगळ्या खासगी रुग्णलयात काम करीत असलेल्या पीडितेचा त्याने पिच्छाच पुरविला. आरोपी विशाल तिला बदनामीची धमकी आणि तिच्या मुलांची हत्या करण्याची धमकी देऊ लागला. वारंवार विशालने त्याची शारीरिक भूक भागवली. तक्रारीवरून पोलिसांनी आरोपी विशालविरुद्ध अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंध कायद्याच्या विविध कलमांसह भारतीय दंड विधानाच्या कलम ३७६, ३७६(२)( एम), ३२३, ५०४, ५०६ नुसार गुन्हा दाखल केला आहे. उपविभागीय पोलीस पोलीस अधिकारी सुधीर पाटील पुढील तपास करीत आहेत.

दरम्यान, महिलांवरील अत्याचारांच्या घटनांमध्ये अलीकडे वाढ झाल्याचे दुर्दे वी चित्र आहे. कामाच्या ठिकाणी झालेल्या ओळखीचा गैरफायदा घेऊन महिलांना भावनिक करून त्यांचे शारीरिक शोषण कसे करण्यात येते याचे ही घटना उदाहरण आहे. शारीरिक अत्याचाराला बळी पडलेल्या महिलेला मागील संबंधावरून धम कावत आणि 'ब्लॅकमेल' करून नराधम कसा गैरफायदा घेतात हे या घटनेवरून दिसून येते. यामुळे कामावरील महिलांनी अशा नराधमांकडून सावध राहणे, दोन हात दूर राहणे काळाची गरज आहे. दुसरीकडे एका हतबल महिलेचे आयुष्य नासविणाऱ्या आरोपी विशाल बोराडे याच्या विरुद्धचा तपास लवकरात लवकर पूर्ण करावा. तसेच विशाल याला कठोर शिक्षा होईल यादृष्टीने तपास करण्याची मागणी नागरिकांतून होत आहे

## गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार अभियान शिरूर अनंतपाळ तालुक्यातील गाळ उपसा कामांची जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केली पाहणी



लातूर, (जिमाका) : जिल्ह्यात गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार अभियान राबविण्यात येत असून या अंतर्गत शिरूर अनंतपाळ तालुक्याती घरणी मध्यम प्रकल्प आणि उमरगा लघु पाटबंधारे तलावातील गाळ उपसा करण्यात येत आहे. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी या प्रकल्पांना भेट देवून तेथील कामाची पाहणी केली. या कामामुळे शेतजमीन सुपीक बनण्यासोबतच प्रकल्पाची साठवण क्षमता वाढण्यासाठीही मदत होणार असल्याचे जिल्हाधिकारी यावेळी म्हणाल्या.

लघु पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता रोहित जगताप, जिल्हा जलसंधारण अधिकारी अनिल कांबळे, निलंगाचे उपविभागीय अधिकारी शरद झाडके, चाकूरचे तहसीलदार नरसिंग जाधव, शिरूर अनंतपाळचे तहसीलदार गोविंद पेदेवाड यांच्यासह शेतकरी यावेळी उपस्थित होते.

गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार अभियान अंतर्गत घरणी मध्यम प्रकल्पातून ८ ते ९ गावातील शेतकऱ्यांनी लोक सहभागातून गाळाचा उपसा केला आहे. सुमारे ६ लाख १० हजार घनमीटर गाळ उपसा करून शेतकऱ्यांनी स्वखर्चाने आपल्या शेतात नेवून टाकला आहे. यामुळे प्रकल्पाच्या साठवण क्षमतेत अंदाजे ६ कोटी लिटरणे वाढ होणार आहे. तसेच उमरदरा लघु पाटबंधारे तलावातून ३२ हजार घनमीटर गाळाचा उपसा झाला असून जवळपास ४६ शेतकऱ्यांनी हा गाळ आपल्या शेतात टाकल्याने जमिनीतील सुपीकता वाढणार आहे. यासोबतच प्रकल्पाच्या साठवण क्षमतेत ३२ लाख लिटरने वाढ होणार असल्याचे लघु पाटबंधारे आणि जलसंधारण विभागाच्या अधिकाऱ्यांनी यावेळी सांगितले.

सिंचन प्रकल्पातील गाळ उपसा करून शेतात टाकल्यामुळे शेतकऱ्यांना दुहेरी फायदा होईल. या गाळामुळे जमिनीची सुपीकता वाढण्यास मदत होणार आहे, तसेच प्रकल्पाची साठवण क्षमता वाढल्याने या वाढीव पाणीसाठ्याचा सिंचनासाठीही लाभ होईल. त्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होण्यास मदत होईल, असा विश्र्वास जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी यावेळी व्यक्त केला. जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या अभियानात सहभागी व्हावे. गाळ उपसा करण्यात आलेल्या प्रकल्पांच्या सभोवतील लोक सहभागातून वृक्षारोपण करण्यात यावे. तसेच शेतकऱ्यांनीही आपल्या शेताच्या बांधावर फळझाडे लावून वृक्षारोपण मोहिमेत सहभागी होणायचे आवाहनही जिल्हाधिकारी यांनी यावेळी केले.

## मित्रानेच केली मित्राच्या मुलाची गळा चिरुन हत्या; चिमुरड्याचा मृतदेह फेकला उरणच्या खाडीत

रायगड, : एका व्यक्तीने मित्राच्याच दहा वर्षीय मुलाची अपहरण करून हत्या केल्याची धक्कादायक घटना उरणमधून सम ोर आली आहे. उरण तालुक्यातील चिर्ले गावात राहणाऱ्या बिंदू राम अजोर (वय ३३) यांनी मोठ्या विश्वासाने आपल्या मुलाला शेजारीच राहणाऱ्या कांताराम सिताराम यादव याच्यासोबत घरी पाठवलं. मात्र, पुढे जे घडले, ते अतिशय भयानक होते.

उरण तालुक्यातील चिर्ले गावात बिंदू राम अजोर (वर्ष ३३) हे गृहस्थ पत्नी आणि आपल्या एकुलत्या एक दहा वर्षे वयाच्या हर्षसह तेथील मढवी यांच्या चाळीत भाड्याने राहत होते. पत्नी गावी गेल्यावर मुलगा आणि वडील घरी एकटेच राहत होते. बिंदू हे वाहनचालक असल्याने त्यांच्या घरी येण्याच्या वेळा ठरलेल्या नव्हत्या ते कोणत्याही वेळी घरी परतायचे. ते कामासाठी बाहेर पडल्यावर घरात मुलगा एकटाच राहत असल्याने वडिलांना काळजी लागून राहायची याच अनुषंगाने त्यांनी आपला मुलगा बिंदू याला मंगळवारी आपल्या मुलाला सोबतच घेऊन कामावर निघाले.वाहनातून मालाची डिलिव्हरी करण्यासाठी ग्लोबल लॉजिस्टिक्स टर्मिनलमध्ये लहान मुलाला प्रवेश देण्यास तेथील सुरक्षा रक्षकांनी नकार दिला. यामुळे मुलाला कुठे ठेवायचे या विवंचनेत असतानाच बिंदू यांनी त्यांच्या शेजारीच राहणाऱ्या कांताराम सिताराम यादव त्याठिकाणी आलेला दिसताच त्यांनी हर्षला त्यांच्याकडे सोपवले. यानंतर त्यांनी हर्ष घरी पोहचला की नाही हे तपासण्यासाठी फोन केला मात्र संपर्क होत नसल्याने त्यांनी शेवटी आपले घर गाठले. मात्र घरी ना मुलगा सापडला ना कांताराम यामुळे बिंदू राम यांनी कांताराम व मुलाचा रात्रभर परिसरात शोध घेतला. दोघांचाही ठावठिकाणा लागला नाही.

सकाळी उरण परिसरातील खोपटा-पोगोटे रिलायन्स या कोस्टल रोड वरील खाडीत येथील एका सुरक्षा रक्षकाला हर्ष याचा मृतदेह आढळून आला. त्यांनी वेळ न घालवता तत्काळ उरण पोलिसांना यांसदर्भातील माहिती दिली. खबर मिळताच उरण पोलीस पथकानेही घटनास्थळी धाव घेतली. खाडीत धारदार शस्त्राने हर्ष याचा गळा चिरून हत्या करून टाकलेले मृतदेह आढळून आल्यानंतर पोलिसांनी शिताफीने संशयित आरोपी कांतारामला पलायनाच्या तयारीत असतानाच ताब्यात घेतले. पोलिसी खाक्या दाखवताच जुन्या भांडणाचा राग मनात धरून हर्षची आपण हत्या केली असल्याची कबुली आरोपी कांतराम यांनी दिली.

दरम्यान घरी पोहचविण्यासाठी म ोठ्या विश्वासाने ओळखीच्या मित्राकडे सोपविलेले. मात्र दहा वर्षीय निष्पाप हर्ष बिंदू यादव यांचे अपहरण करून निष्पाप जीवाची गळा चिरून हत्या केली. मित्रांनेच एकुलत्या एक असलेल्या मित्राच्या मुलांची गळा चिरून हत्येच्या दुदैवी प्रकारामुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. या घटनेचा पुढील तपास उरण येथील पोलीस यंत्रणा करत आहेत.

आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर वाचा एका क्लिकवर www.dainiklaturprabhat.in

# झरोका

एक – कारण नसतानाही उद्याच्या लोकसभा निवडणूकीत भाजपा, मोदी सत्तेवर येणार आणि संविधानच काय भारताचे नांव बदलून बहूमताच्या जोरावर भारता ऐवजी मोदीनगर असे भारताचे नामांतर करण्याचा डाव मोदी मित्रमंडळाने घेतला आहे म्हणे अशी कुजबूज चौका, चौकात होताना दिसते आहे. त्या सिबीआय, ईडीला कांही वेळ, काळ, अक्कल आहे की नाही हेच कळत नाही. डोकं बधीर, सैराट झालय.

दुसरा – अरे, निवडणूकीच्या वाऱ्यात गांजा पिलास की पांढरी सुंगलीस हा भारत लोकशाही प्रधान आहे, दीन, दलित, अल्पसंख्याक बहूजंनाचा, शूर मराठ्याचा आहे, कोणा तीन, साडेतिन टक्केवाल्याचा नाही. संविधानाला तर कोणीच हात लावू शकत नाही. इंग्रजाला झिडकारुन पेशव्याचा खात्मा करणारी औलादच संविधानाचे रक्षण करण्यास सक्षम आहे. मग भारताचे नांव बदलण्याची तर भाषाच सोड, असले गळाकाढू कितीही नरेंद्र मोदी आणी त्यांची मोदाड संस्कृती जरी उदयास आली तरी संविधान आणी भारत हे अखंड, अमर राहातील हे लक्ष्यात ठेव.

एक – अहो, बहूमतावर गेली दहा वर्ष प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे मनमानी करतात. राज्यसभेतील ठरावही कार्यान्वीत न करता वटहूकूम काढून मनमानी आदेश जारी करतात. म्हणून तशी भिती वाटते आहे. म्हणून बोलतोय.

दुसरा – अरे, सत्ताकारणात असं, तसं घडू शकते. लोकशाहीत ते सहन करावे लागते याचा अर्थ असा नाही की, सत्ताधारी भारताच्या अस्तित्व, अस्मितेचाच गळा घोटतील हे असे कोणी ही सहन करु शकत नाही आणी तसे स्वप्न पाहाणाऱ्यानी आपली वसरी वघूनच पाय पसरावेत हे ज्याना, त्याना पटवून दे म्हणजे काय ते कळेल.

एक – अहो, तसे घडू शकत नाही. त्यास धाडस लागते पण तसे घडलेच तर काय ? म्हणून काळजी वाटतेय.

दुसरा – अरे, संविधान आणी भारताचे नांव बदलणारा कोणीच नाही. मोदी तर किस झाड की पत्ती पण तसे करण्याचा जर कोणी प्रयत्न केला तर त्यास पाकिस्तानतही स्मशान घाट मिळणार नाही. एवढे मात्र खरे, समजले !

# काय बोलता राव ?

मतपेढी वाचविण्यासाठीच अयोध्या, राममंदीर प्रतिष्ठापणा सोहळा कार्यक्रमास कॉग्रेसचे राहूल गांधी आणी शिवसेनेचे उध्दव ठाकरे हे निमंत्रण देवूनही आले नाहीत उलट लोकसभा निवडणूकीत मुस्लिमाचे लांगूणचालन करुन देश सरिया कायद्यावर चालविण्याचा प्रयत्न कॉग्रेस, इंडिया आघाडी करीत आहे ते खपवून घेतले जाणार नाही असा दम केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यानी चक्क राहूल गांधी आणी उध्दव ठाकरे यांना दिला आहे.

## काय बोलता राव,

अरे, हिंदूजनाची मखलसी करण्यासाठी, केंद्र सरकारला तसा अधिकार नसतानाही प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यानी सरकारी यंत्रणेचा गैरवापर करुन धार्मीक कार्यक्रम, राममूर्ती प्रतिष्ठापणा केली. उलट तेथील मजिद, बौध्दविहारावर नांगर फिरविला हे झाकून नौटंकी करणाऱ्या मोदी, शहा यांनी कॉग्रेस, सेनेवर टीका करण्याची गफलत कशाला करावी भारत हा लोकशाही प्रधान देश आहे. भारतीय राज्य घटनेवर देशाचा कारभार चालतो आहे मग शरियावर गांधी, ठाकरेचे काय मोदीही कारभार करु शकत नाहीत हे अमित शहा यानी लक्ष्यात घ्यावे मग काय ते बोला दाजीबा.

## मराठवाड्यात फक्त होरपळणाऱ्या शेतकऱ्यांच्या आत्महत्येचीच गॅरेंटी; ४ महिन्यात २६७ जणांचा गळफास

बीड, : शेतकऱ्यांचे उत्पन दुप्पट करण्यासाठी डांगोरा पिटला जात असताना प्रत्यक्षातम मराठवाड्यात शेतकऱ्यांची किती भयावह अवस्था सुरु आहे याचीच प्रचिती आली आहे. महाराष्ट्रातील शेतकरी परिस्थितीशी संघर्ष करत असतानाच एकट्या मराठवाडा विभागातील आठ जिल्ह्यातील २६७ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे समोर आलं आहे. त्यामुळे राज्यात निवडणुकीची रणधुमाळी सुरु असतानाच दुसऱ्या बाजूला शेतकऱ्यांच्या संसाराची राखरांगोळी सुरु असल्याचे भयावह चित्र आहे. मराठवाडा विभागात सर्वाधिक आत्महत्या ऊस मजूर सर्वाधिक असणाऱ्या बीड जिल्ह्यात झाल्या आहेत. मराठवाड्यात गेल्या चार महिन्यात २६७ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असून सर्वाधिक आत्महत्या बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या आहेत. बीडमध्ये ५९ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. त्यानंतर छत्रपती संभाजी नगरचा नंबर असून ४४ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. त्यामुळे निसर्गाच्या दृष्टचक्रात सापडलेल्या शेतकऱ्यांची वाताहत सुरु असल्याचे चित्र आहे. शेती आणि शेतकऱ्यांसाठी बेंबीच्या देठापासून घसा कोरडा केला जात आहे. यासाठी शासकीय आकडेवारीची फेकाफेकी केली जात असली, तरी शेतकऱ्यांपर्यंत किती लाभ पोहोचत आहेत याचाच अंदाज येण्यास आत्महत्यांची आकडेवारी पुरेसी आहे.

गेल्या चार महिन्यात झालेल्या आत्महत्या,जालना २९,परभणी १२,हिंगोली १३,नांदेड ४१,बीड ५९,लातूर २७,धाराशिव ४२,एकूण २६७, गेल्या चार महिन्यांत २६७ शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या असतानाच २०२३ मध्ये म राठवाड्यातील आठ जिल्ह्यांमध्ये तब्बल १,०८८ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे विभागीय आयुक्त कार्यालयाच्या अहवालातून समोर आले होते. २०२२ च्या तुलनेत हा आकडा ६५ ने वाढला होता. २०२३ मध्ये झालेल्या १,०८८ आत्महत्यांपैकी बीडमध्येच सर्वाधिक २६९ आत्महत्या झाल्या होत्या. छत्रपती संभाजीनगरमध्ये १८२, नांदेडमध्ये १७५, धाराशिवमध्ये १७१ आणि परभणीमध्ये १०३ आत्म हत्या झाल्या, असे अहवालात नमूद करण्यात आले आहे. जालना, लातूर आणि हिंगोली येथे अनुक्रमे ७४, ७२ आणि ४२ मृत्यूची नोंद झाली आहे. मराठवाड्यात २०२२ मध्ये सुद्धा १,०२३ शेतकरी आत्महत्या झाल्या. ज्यामध्ये छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, हिंगोली, धाराशिव, लातूर, नांदेड आणि परभणी जिल्ह्यांचा समावेश आहे.

# लबाड लांडगं, ढोंग करतया !

## संपादकीय...

जुनी पुराणी कहानी अशी आहे की, गाव पाटलाकडे कांहीच उरले–सुरले नसताना त्याने त्या गाव–शिवारात नसलेल्या विषयावर रंधकंदन केले आणि त्या लांडग्याला कोल्हा शहाणपण शिकवायला आला. कोल्हा कथित निळ्या शाईच्या डब्यात पडला तर लांडगा मात्र चक्क पाणी नसलेल्या कोरड्या विहिरीत पडला आणि सोंग मात्र जैसे थे असेच राहिले अशीच अवस्था लोकसभा निवडणुकीची झाल्याचे चित्र दिसते आहे.

भारत हा लोकशाहीवादी, धर्मनिरपेक्ष देश असतानाही प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे धर्म–जातीवर भाष्य करायच दिसत आहेत. टीका आणि टिपणी यापलीकडे लोकसभा निवडणुकीत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याकडे दुसरा विषय नसल्याने ते हिंदू –मुस्लिम अशी दरी पाडून काँग्रेस मतपेटीचा डाव काँग्रेस आखते आहे असा आरोप नरेंद्र मोदी करतात पण नाहक तोंड देण्याऐवजी काँग्रेस नेते भारतीयत्वाकडे अधिक लक्ष देताना दिसत असले तरी नाका परीस नथनी जड अशी अवस्था होत असल्याने मोदीजींना वेळीच आवर घालण्याऐवजी प्रक्रिया मतदारच करीत असल्याचा बोलबाला होताना दिसतो आहे तो नाकारता येण्यासारखा नसावा.

महाराष्ट्रातील कल्याण–नासिक– मुंबई परिस्थितीतील महाराष्ट्राच्या उमेदवाराच्या प्रचारासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी कल्याण सह शक्य त्या ठिकाणी सभा घेतल्या. मुंबईत रोड शो करून मी तुमच्या पाठीशी आहे. तुम्ही साथ द्या अशी गवसणी घातली आणि भारताची केंद्र सरकारची आर्थिक राजधानी मुंबई मलाच मिळू दे रे बाबा म्हणून मरे आईला साकडे घातले कारण मुंबईत अंबादेवी तुळजाभवानी कोठे आहे तेच कुणी सांगत नव्हते त्यात माहितीगार उद्धव ठाकरे यांना कोण विचारणार, आणि शरद पवार. यांच्याकडे कोण साकडे घालणार? म्हणून मरीआई, मसोबा परवडला म्हणून मध्यम मार्गातून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी मुंबई परिसरातील लोकसभा निवडणूक प्रचार सभेचा नारळ फोडला पण तो ऐनवेळीच नासका निघाल्याने शेतकऱ्याचा नांगर आडवा नको म्हणून त्यांना परतावे लागले याचे कारण काय अशी चर्चा होताना दिसते आहे.

काँग्रेस आणि भाजप हे दोन्ही राजकीय पक्ष जातीवादी आहेतच. धर्मांध शक्तीचे पाठ राखण करणारे आहेतच पण काँग्रेस लपून–छापून डाव साधते तर भाजपा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या आडून बाण मारते हे वास्तव असून मांडी आड चोरी आण नवऱ्याआड शिंदाळकी अशीच कार्यपद्धती व्यवहारात काँग्रेस, भाजपाचा असला तरी सारे काही खोटे–नाटे असतानाही माझेच खरे म्हणून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी मुंबईत जो नालायकी थरात केला तो माणुसकीला काळिंमा फासणारा असाच त्यामुळे लबाड लांडगा ढोंग करतया असे म्हटल्यास वावगे ठरू नये असाच बोलबाला होताना दिसतो आहे तो कोणीही नाकारू शकत नाही.

भारताचे प्रधानमंत्री, भारताचे पालक–मालक–शासक–प्रशासक आणि लोकसेवक असलेले नरेंद्र मोदी यांनी मुंबईतील सहा लोकसभा मतदारसंघाच्या भाजपा उमेदवाराच्या प्रचारार्थ घाटकोपर येथे रोडशो केला आणि मुंबईसह सारे जग अचंबित झाले कारण एका होर्डिंगच्या कोसळल्याने घाटकोपर येथील सर्वसामान्य १८ आणि नंतर २४ च्या पुढे मरण पावलेल्या मृत्यू देहावरून नरेंद्र मोदी यांनी भाजपच्या उमेदवारांना मते. द्या म्हणून मागणीसाठी देखावा मिरवणूक काढली अन अपघाती मृत्याच्या मुद्द्यावरील त्यांच्या टाळू वरील लोणी चोखून लोकसभेत बहुमत सिद्ध करण्यासाठी सॉंग–केले यामुळे नौटंकी करणाऱ्या प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अशा बेताळ–निर्लज्ज कार्यपद्धतीवरून जनता रोष व्यक्त करताना दिसत आहे कारण हत्या आणि अपघात झाली असतानाही केवळ मतासाठी प्रेतावर पाय ठेवून नरेंद्र मोदी मते मागणार असतील तर उद्याच्या भारताचा सर्वकष विकास कसा साध्य करतील आणि नागंरी समस्या सोडवून भारत महासत्ता देश कसा काय बनवतील अशीच संताप जनक उलट सुलट प्रतिक्रिया व्यक्त होत असून गोध्रा हत्याकांड, आयोध्या मज्जिद तोड फोड प्रकरण, मुंबई बॉम्बस्फोट, सर्जिकल स्ट्राइक, मणिपूर हत्याकांड आणि घाटकोपर होर्डिंग अपघात मृत्यूप्रकरणी शांत–शांत असणारे मोदीजी कितपर्यंत लबाडी करून ढोंग करून लोकांना फसवीत राहणार आहेत अशीच लोक भावना व्यक्त होताना दिसते आहे.

## तुमच्या नेत्यांनाही महाराष्ट्रात फिरायचेय, गुंडगिरी किती दिवस सहन करायची; मनोज जरांगेचा मुंडे

बीड, : तुमच्याही नेत्यांना महाराष्ट्रात फिरायचं आहे. तुमची गुंडगिरी आम्ही किती दिवस सहन करायची, असा सवाल विचारत मनोज जरांगे पाटील यांनी मुंडे बहीण–भावावर हल्लाबोल केला. बीडच्या नांदुर घाट गावात रात्री झालेल्या दगडफेकीमध्ये अनेक जण जखमी झाले आहेत. या जखमी रुग्णांची मनोज जरांगे पाटील यांनी गुरुवारी बीड जिल्हा रुग्णालयात जाऊन भेट घेतली. यावेळी माध्यमांशी बोलताना जरांगे पाटील यांनी पंकजा मुंडे आणि धनंजय मुंडे यांच्यावर टीकास्त्र डागले. मला सुद्धा धमकी देत आहेत, बघून घेऊ ,कचाट्यात ये मारून टाकू, मला बीडमध्ये येऊ द्यायचं नाही, असे म्हणत आहेत. आता तर मी रोज बीडमध्ये येणार, दोघं बहीण–भाऊ कार्यकर्त्यांना माझ्या विरोधात पोस्ट टाकायला लावत आहेत, असा आरोप मनोज जरांगे पाटील यांनी केला.

मराठा आरक्षणासाठीच्या उपोषणाला नाव ठेवलं त्यावेळेस विरोध केला. पण मी एकदाही म्हणालो नाही पंकजा ताईला पाडा किंवा म हाविकास आघाडीचा उमेदवार पाडा. पण हे आम्हाला माहिती आहे वेळ निघून गेले की असे होणारच. मी बलिदान देण्यासाठी तयार आहे. मात्र, मी मागे हटणार नाही. मला बीडमध्ये येऊ देणार नाहीत तर तुमच्याही नेत्यांना महाराष्ट्रात फिरायचे आहे. तुमची गुंडगिरी आम्ही किती दिवस सहन करायची आमच्याकडेही खुंखार लोक आहेत. मराठा समाज इतका लेचापेचा नाही, तुमच्याही नेत्यांना महाराष्ट्रात आणि मुंबई, पुणे, संभाजीनगरला फिरायचे आहे. म ला बीडमध्ये येऊ देणार नाहीत, असे म्हणत आहेत. मराठा समाजाचे असे उपकार फेडता का? तुमच्या व्यासपीठावर मराठा समाजातील नेत्यांना बसायला जागा नव्हती.

मराठ्यांची मतं लागतात, मराठ्याचे नेते प्रचाराला लागतात. मराठ्याच्या मतांवर मोठे व्हावे लागते, पण अन्याय हा प्रत्येकवर्षी सुरु आहे. स्वत:चे संकट अंगावर आहे त्यावेळेस आपला सहित पाया पडतात आणि संकट निघून गेले की लगेच बदलतात. आष्टी पाटोद्यात काय झाले, बीडमध्ये काय झाले, माजलगाव आणि परळीमध्ये काय झाले संपूर्ण महाराष्ट्र बघतोय.

मराठ्यांच्या जीवावर मोठा घेऊन म राठ्यांचा जीव घ्यायचा असेल तर मराठा जीव द्यायला तयार आहे. दोघा बहीण–भावांचा विषय आहे. शेवटी मराठी मत घ्यायचे मोठे व्हायचे, कोणत्याही पक्षात राहायचे आणि मोठे व्हायचे. हा खरा अपमान मराठा नेत्यांचा आहे. जात संपली तर नेत्यांना काय किंमत राहणार?, असा सवाल जरांगे –पाटील यांनी उपस्थित केला.

माझे रक्षण मराठा समाज करत आहे. मला कोणाची गरज नाही. बघू किती दिवस सहन होत आहे. ते पोलीस अधीक्षक कशामुळे गुन्हे दाखल करून घेत नाहीत? लेकरांची तडफड होते, गृहमंत्री साहेबांचे राज्य आहे का? अन्याय सुरू आहे. जात संपली की तुम्हीही संपलात, मराठ्यांच्या नेत्यांनो सावधान, आम्ही शांत पद्धतीने बघणार आहोत. बहिण भाऊ किती दिवस हल्ले करून येतात हे पाहणार आहोत. जोपर्यंत सहन होत आहे, तोपर्यंत सहन करू, पण मराठा समाजात खूप मोठी खदखद निर्माण झाली आहे, असे जरांगे पाटील यांनी सांगितले.

## '१६ जीव गेले तिथे पंतप्रधान...'; मोदींच्या रोड शोवर संजय राऊतांची टीका, म्हणाले, सगळे बंद केले

मुंबई : शिवसेना ठाकरे गटाचे नेते खासदार संजय राऊत यांनी मुंबईत पंतप्रधान नरेंद्र म ोदी यांच्या रोड शोवर जोरदार टीका केलीय. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आअणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावरही राऊतांनी निशाणा साधला. ते म्हणाले की,''हे सरकार एक घटनाबाह्य सरकार आहे. घटनाबाह्य मुख्यमंत्री प्रचार करतात घटना भाह्य उपमुख्यमंत्री प्रचार करत आहेत महाराष्ट्रात फिरत आहेत.'' पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या बुधवारी महाराष्ट्रात सभा आणि रोड शो झाले. नाशिकमध्ये सभेनंतर मुंबईत घाटकोपर इथे मोठा रोड शो झाला.

संजय राऊत यांनी मुख्यमंत्री शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका करताना म्हटले की, जे दोन घटनाबाह्य पक्ष बरखास्त व्हायला पाहिजेत, घटनेतील दहाव्या शेडूलनुसार ते बरखास्त झाले पाहिजेत ते प्रचार करत आहेत. ज्या घटनेचं रक्षण केलं पाहिजे, सर्वोच्च न्यायालयात यावर तारीख देत आहेत. म्हणून आम्ही संविधान बचावाची लढाई या लोकसभेमध्ये लढत आहे.

शिंदेंच्या जाहीरनाम्यावरही राऊतांनी हल्लाबोल केला. घटनाबाह्य सरकारला घटनाबाह्य सरकारचा जाहीरनामा कशाला पाहिजे आहे. घटनाबाह्य हेच त्यांचा जाहीरनामा आहे. हेलिकॉप्टर मधून खोके उतरवायचे, पोलिसांच्या गाडीतून पैसे वाटायचे, खोटा योजना आणायच्या हा त्यांचा जाहीरनामा आहे अशा शब्दात राऊतांनी मुख्यमंत्री शिंदेंवर टीका केली.हे चोर लोकं बोलत आहे ज्यांनी पार्टी वरती डाका टाकला. यांनी मान्य केलं की चोरी केली आहे. हे कसे लोक आहेत जे पार्टी चोरी करतात आणि वरतून बोलतात. चोराला मदत करणारे पंतप्रधान, गृहमंत्री, चुनाव आयोग हे लोक चोरांच्या साथीदार आहेत. हेच लोक चोरांचे सरदार आहेत. त्यामुळे आम्हाला देशात परिवर्तन आणायचा आणि देशाचे संविधानाचा बचाव करायचा आहे असंही राऊतांनी म्हटलं. कोणता पक्ष कुठे आहे आणि बीजेपी कुठे आहे हे ४ जूनला समजेल. देशाच्या प्रधानमंर्त्यांच्या रोडशोसाठी काल सगळं बंद केलेलं होतं. मेट्रो रेल्वे रस्ते बंद केलं. हे कार्यवाहक पंतप्रधान आहेत. मोठा होर्डिंग पडून ज्या ठिकाणी सतरा लोकांचा जीव गेला त्या ठिकाणी प्रधानमंत्री रोड शो करतात. हे सगळं कोणासाठी? अशा प्रकारचा प्रचार कधी देशात झाला नव्हता, असे कोणतेही पंतप्रधान या आधी पाहिले नाहीत. एका माणसाचा प्रचार सुरळीत व्हावा यासाठी लोकांच्या गैरसोय करणारा हे पहिल्यांदा पाहिला अशी टीका संजय राऊत यांनी पंतप्रधान म ोदींच्या रोड शो वर केली.महाराष्ट्रात आणि देशात सर्वात मोठा विरोध मोदी आणि शहा यांना होत आहे. ४ जून नंतर या देशात भाजपाचे अस्तित्व राहणार की नाही हा मोठा प्रश्न आहे. परंतु विरोधी पक्ष म्हणून भारतीय जनता पार्टीला सन्मानाचा पद मिळावा ही अपेक्षा आहे. ममता बॅनर्जी आमच्या सोबत आहेत ते सुद्धा नरेंद्र मोदींनी शाळांना विरोध करत आहेत जे काय होईल ते सोबत होईल ममता बॅनर्जी आमच्या दीदी आहेत असेही राऊतांनी म्हटले.

## 'या' भागात आठवडाभर वादळी वाऱ्यांसह मुसळधार पावसाचा इशारा

मुंबई, : एकीकडे लोकसभा निवडणुकांचा धुरळा आणि दुसरीकडे अवकाळी पावसाने थैमान घातलं आहे. अवकाळी वादळी वाऱ्याच्या पावसामुळे मुंबईत टॉवर, होर्डिंग, पूल कोसळ्याच्या घटना घडल्या तर बंगळूरम ध्ये चक्क २७०हून अधिक झाडं कोसळ्याचे धक्कादायक प्रकार घडले आहेत. राज्यात या अवकाळी पावसाने चांगलच रौद्र रुप दाखवले आहे. अशातच हवामान खात्याने बंगळूर शहराला सावधानतेचा इशारा दिला आहे. उत्तर भारतात मे महिन्यातील कडाकाच्या उन्हाने नागरिकांची लाही–लाही होत आहे. पण दक्षिण भारतातील अनेक भागांत मुसळधार पावसाने थैमान घातले आहे. भारतीय हवामान खात्याने कर्नाटकची राजधानी बंगळुरूमध्ये आज वादळ आणि विजांच्या कडकडाटांसह मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला आहे.

१६ मे ते २१ मे पर्यत बंगळुरूमधील हवाम ान खूप ढगाळ असेल. तसेच, सोसाट्याच्या वाऱ्यांसह मुसळधार पाऊस कोसळण्याचीही शक्यता भारतीय हवामान खात्यानं व्यक्त केली आहे. आठवडाभर शहरात मुसळधारेचा अंदाज आहे. १६, १७ आणि १९ मे रोजी वातावरण ढगाळ असू शकतं. तसेच, अधूनम धून ढगांच्या गडगडाटासह आणि विजांच्या कडकडाटासह पाऊस कोसळण्याची शक्यता आहे.

तीन दिवसांपूर्वी मुंबईत वादळी वाऱ्यांसह जोरदार पाऊस झाला होता. या पावसानंतर मुंबईत तात्पुरता गारवा जाणवत होता. परंतु, गेल्या दोन दिवसांपासून मुंबईतील उकाडा प्रचंड वाढला आहे. आजदेखील ही परिस्थिती कायम राहण्याची शक्यता आहे. मुंबईतील उष्ण आणि दमट हवामानामुळे नागरिकांना आणखी काही दिवस उन्हाच्या झळा सोसाव्या लागणार आहेत.

जागतिक हवामान संघटनेच्या माहितीनुसार, गेल्या तीन दशकांमध्ये जगभरात उष्माघातामुळे होणाऱ्या एकूण मृत्यूंपैकी एक पंचमांश मृत्यू हे भारतात झाले आहेत. कोरड्या हवामानात आणि कमी–म ध्यम उत्पन्न असलेल्या भागात सर्वाधिक मृत्यूदर असल्याचे निरीक्षण 'कोपर्निकस क्लायमेट चेंज सर्व्हिस' आणि नोआच्या मासिक अहवालात नोंदवण्यात आले आहे.

दरम्यान, हवामान खात्याने जारी केलेल्या अंदाजानुसार मान्सून १९ मेपर्यत अंदमानमध्ये दाखल होऊ शकतो. त्यानंतर ३१ मेच्या आसपास नैऋत्य मोसमी वारे केरळमध्ये दाखल होणार आहे. त्यापुढील वातावरण पोषक असेल तर मान्सून ७ ते १० जूनच्या आसपास महाराष्ट्रात दाखल होऊ शकतो.

## सुस्त व्यवस्थेचे बळी

मानवनिर्मित आणि नैसर्गिक आपत्ती असे दोन आपत्तींचे प्रकार आहेत. या दोन्ही आपत्तींमध्ये जीवित आणि वित्तहानी मोठ्या प्रमाणात होते. जगातील इतर देशात नैसर्गिक आपत्तीत बळी गेलेल्यांची संख्या अधिक आहे मात्र आपल्या देशात मानवनिर्मित आपत्तीतच अधिक बळी गेले आहेत.

दरवर्षी हा आकडा वाढतच चालला आहे. आताही मुंबईत अशीच मानवनिर्मित आपत्ती आली आणि त्यात चौदा निष्पाप मुंबईकरांचा बळी गेला. मुंबईतील घाटकोपर येथे एक अजस्त्र होर्डींग ( जाहिरात फलक ) पेट्रोल पंपावर कोसळले. त्या होर्डिंग खाली अनेक गाड्या अडकल्या आणि त्या खाली चिरडून चौदा जणांचा मृत्यू झाला तर सुमारे नव्वद हून अधिक जण गंभीर जखमी झाले. बचाव कार्य अजूनही सुरू असून मृतांचा आकडा आणखी वाढण्याची भीती व्यक्त होत आहे. या निमित्ताने शहरा शहरात लागलेल्या अनधिकृत होर्डींगचा प्रश्र्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. आज अनधिकृत होर्डींग फक्त पुण्या – मुंबई सारख्या महानगरातच लागलेत असे नाही तर ग्रामपंचायत असलेल्या ग्रामीण भागातही असे होर्डींग आपल्याला पाहायला मिळतात. राज्य किंवा राष्ट्रीय महामार्ग, रस्त्याच्या कडेला,गावागावात शहारा शहरात असे असंख्य होर्डींग आपल्याला पाहायला मिळतात अर्थात यातील ७० ते ८० टक्के होर्डींग अनधिकृत असतात.

जे अधिकृत असतात ते त्यांना दिलेल्या परवानगीच्या आकाराच्या दुप्पट किंवा तिप्पट आकाराचे असतात. आता घाटकोपरला कोसळलेला होर्डींग हा त्याला दिलेल्या परवानगीपेक्षा तिप्पट आकाराचा होता. बरं इतका मोठा अजस्त्र, नियमापेक्षा ही अधिक आकाराचा होर्डींग गेले तीन वर्ष ना महापालिकेला दिसला ना रेल्वे अधिकाऱ्यांना. आश्र्चर्य आहे ना ? पण यात आश्र्चर्य वाटण्यासारखे काही नाही आपल्याकडे हे असेच असते. जो पर्यंत एखादी दुर्घटना होऊन निष्पापांचा बळी जात नाही तोवर तेरी भी चूप और मेरी भी चूप..... कारण यामागील अर्थकारण. असे अनधिकृत आणि विनापरवानगी लागलेले होर्डींग म्हणजे भ्रष्टाचाराची खान आहे यात लाखो रुपयांचे अर्थकारण लपलेले आहे. भ्रष्ट अधिकाऱ्यांचे हात आधीच ओले झालेले असल्याने ते अशा अनधिकृत होर्डींगवर कारवाई करतीलच कशी?

बरे अशी काही दुर्घटना घडली, काहींचा बळी गेला की अधिकारी याला वादळ, वारा, पाऊस यांना जबाबदार धरून हात झटकून मोकळे होतात. दुर्घटना घडली की टिव्ही वर ब्रेकिंग न्युज झळकते. टीव्ही वर चर्चासत्र आयोजित केली जातात. सत्ताधारी व विरोधी पक्ष एकमेकांवर आरोप करून आपली राजकीय पोळी भाजून घेतात, वर्तमानपत्रात लेख अग्रलेख छापून येतात. मग सरकारला जाग येते सरकार मृतांना आणि जखमींना नुकसान भरपाई देते. कोणावर तरी आरोप निश्र्चित केले जातात.

ज्याच्यावर आरोप निश्र्चित केले जातात तो आधीच फरार होऊन अटकपूर्व जामिनासाठी अर्ज करतो, सरकार दुर्घटनेची चौकशी करण्यासाठी एखादा चौकशी आयोग नेमते तोवर टीव्ही वर दुसरी ब्रेकिंग न्युज झळकलेली असते. अगोदरच्या दुर्घटनेची ब्रेकिंग न्युज मागे पडते. प्रसार माध्यमांना नवे खाद्य मिळते. जनताही काही दिवसांनी सर्व विसरते. मग पुन्हा काही महिन्यांनी अशीच एखादी दुर्घटना घडते आणि आणि काही निष्पाप नागरिकांचा बळी जातो मग पुन्हा हेच चित्र पाहायला मिळते. पण मागील दुर्घटनेतून कोणीही बोध घेतलेला नसतो. मागील दुर्घटनेच्या चौकशीसाठी नेमलेल्या चौकशी आयोगाचे काय झाले. या आयोगाने कोणाला दोषी धरले? दोषी धरलेल्या व्यक्तीस काय शिक्षा झाली ?

या चौकशी आयोगाने पुन्हा अशी दुर्घटना घडू नये म्हणून कोणत्या उपाययोजना सुचवल्या, त्या उपाय योजनांची अंमलबजावणी झाली का ? हे सर्व गुलदस्त्यात राहते. नव्या दुर्घटनेत पुन्हा तोच सोपस्कार केला जातो म्हणूनच आपल्याकडे मानवी दुर्घटना कमी न होता वाढत आहेत. आता हेच पहा ना पुण्यात पाच वर्षापूर्वी असाच एक मोठा होर्डींग पुण्यातील जुना बाजार परिसरात कोसळला होता त्यात चार जणांचा जीव गेला, त्यानंतर मागील वर्षी कात्रज, देहूरोड, बाह्यवळण मार्गावर पाऊस आणि वादळी वाऱ्यात लोखंडी फलक कोसळून पाच जण दगावले होते. तेंव्हाही हाच सोपस्कार पार पाडण्यात आला होता. तेंव्हा घडलेल्या दुर्घटनेतून आपण कोणताही बोध घेतला नाही. तेंव्हाही हा प्रश्र्न असाच ऐरणीवर आला होता पण पुढे काहीच झाले नाही पुण्यासह राज्यातील प्रमुख शहरात अनधिकृत होर्डिंग्ज लागलेच आणि त्यामुळेच घाटकोपर मध्ये पुण्यातील दुर्घटनेची पुनरावृत्ती झाली. जोवर अशा दुर्घटनेस जबाबदार व्यक्तींना आणि भ्रष्ट अधिकाऱ्यांना कडक शिक्षा होत नाही तोवर अशा दुर्घटना घडतच राहणार आणि त्यात निष्पाप नागरिकांचा बळी जातच राहणार. जोवर शासन प्रशासन आपले कर्तव्य इमानदारीने पार पाडत नाही तोवर अशा दुर्घटना घडतच राहील आणि त्यात निष्पाप नागरिकांचे बळी जातच राहील.

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## (गुरु वचन)
## प्रगतीसाठी मत्सर नव्हे, प्रेरणेची गरज

मत्सर करणारा माणूस प्रगती करण्याऐवजी इतरांच्या प्रगतीत अडथळे उत्पन्न करीत असतो. असा माणूस मानसिक कुरापतीमुळे स्वत: महत्त्वकांक्षी नसतोच उलट स्वत:च्या व इतरांच्या प्रगतीतील अडसर असतो. त्याची विकृत व संकुचित मानसिकता म्हणत असते कि, मी बसलो आहे तर तूही पुढे जाऊ नकोस. पुढे जाण्यासाठी, प्रगती करण्यासाठीही मत्सराची नव्हे तर प्रेरणेची गरज असते. एखाद्याला एखादी गोष्ट उत्तमरित्या करताना पाहून त्यापासून प्रेरित होणे व त्यांचे अनुकरण करणे माणसाला झुंजार व प्रगतिशील बनवते. तसेच स्पर्धेची भावना पुढे जाण्यास मदत करते. प्रत्येक यशस्वी व्यक्तिने कोणाकडून तरी प्रेरित होऊन व त्याच्या गुणांचे अनुकरण करूनच यश संपादन केलेले असते. कोणाचा मत्सर करून नव्हे. मत्सरामुळे तर आपले भविष्य व करियर दोन्हीही नष्ट होते. म्हणूनच मत्सर जाळून प्रेरणा पाळायला, जोपासाणे आवश्यक आहे.

## उपदेशकथा
## कृतज्ञता

एका गावात एक वृद्ध शेतकरी राहात होता. त्याला मूलबाळ काही नव्हते म्हणून तो दु:खी जीवन जगत होता परंतु आपले मन प्रसन्न रहावे म्हणून त्याने अनेक पशूंना पाळले होते. शेतावर जेवढे काम करता येईल तेवढे काम करायचा अन् बाकीचा वेळ विश्रांती घेत घालवायचा. एक दिवस असाच जंगलातून इकडे तिकडे फिरताना त्याला एक माकडवाला दिला. त्याच्या पिंजऱ्यात एक माकडाचे पिलू मरणावस्थेत दिसले. त्याने ते सोडवले. त्या पिलाला आपल्या घरी आणले. त्याला दूध पाजले. त्याची थोडी देखभाल केली. हळूहळू त्याची तब्बेत सुधारू लागली. माकडाच्या पिलाला त्याचा लळा लागला. ते वृद्ध शेतकऱ्याच्या लहान सहान कामी उपयोगी पडू लागले. ते पाहून शेतकरी खूश झाला. त्या शेतकऱ्याजवळ नाही म्हटले तरी थोडे धन होते. चोरांना त्याचा सुगावा लागताच एका रात्री त्यांनी त्याच्यावर धाड घातली. एक चोर शेतकऱ्याच्या छातीवर बसून त्याला मारायला लागला. बाकीचे चोर पैसे शोधू लागले. त्या माकडाच्या पिलाने ते पाहिले. त्याने जोरात आरडाओरडा करावयास सुरुवात केली. तो आवाज ऐकून आजूबाजूचे लोक धावत आले. त्या माकडाच्या पिलाने छातीवर बसलेल्या चोराला सळो की पळो करून सोडले. चोर पळू लागले पण लोकांनी त्यांना अखेर पकडलेच. लोकांनी त्या माकडाच्या पिलाचे फार कौतुक वाटले. त्याच्या हुशारीमुळे चोर पकडले गेले व शेतकऱ्याचा जीव वाचला.

कथा उपदेश : परोपकाराचे फळ कधी ना कधी तरी मिळतेच.

## त्यांच्या वाणीतून....

देशात आपले सरकार आल्यापासून आपण आपल्या शत्रूंच्या मुसक्या आवळल्या आहेत. आपल्या शेजारचा देश पाकिस्तानची भारताला ललकारण्याची हिंमत नाही. मात्र हे काँग्रेसवाले असे सांगतात की पाकिस्तानचा सन्मान करा, का? तर म्हणे, त्यांच्याकडे अणूबॉम्ब आहे. अरे त्या पाकिस्तानकडे त्यांच्या दैनंदिन खर्चासाठी पैसे नाहीत आणि तुम्ही आम्हाला त्यांची भीती दाखवता?

**पंतप्रधान नरेंद्र मोदीं**

सर्वसामान्य लोकांमधील भगरे सर यांना लोकसभेत पाठवा. तुमच्या जिल्ह्यातील दोन जागा राजाभाऊ वाजे, आणि भास्कर भगरे यांना निवडून द्या ही विनंती करण्यासाठी आज इथे आलो आहे. १९८० साली या जिल्ह्यातील सगळ्या जागा आमच्या पक्षाच्या निवडून आल्या होत्या. ही निवडणूक अतिशय महत्वाची आहे रावसाहेब थोरात यांचे आज स्मरण होते आहे. शिक्षण क्षेत्रात अतिशय महत्वाची कामगिरी त्यांनी केली. मविप्रचे संस्थापक याच गावचे आहेत ही अंत:करणात आहे.

**राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार**

मोदींनी काल महाराजांचा जिरेटोप घातला, आज गांधीटोपी घातली. रोज टोप्या बदलणारा माणूस पंतप्रधान पाहिजे तुम्हाला? प्रफुल्ल पटेलांना सांगतोय. पटेल तुम्ही वाटेल त्याच्या डोक्यात महाराजांचा जिरेटोप घालू नका. जरी तुम्ही प्रफुल्ल पटेल असलात तरी महाराष्ट्र तुम्हाला आपटेल. जिरेटोप तुम्ही मोदींच्या डोक्यावर ठेवता त्यांची महाराजांची बरोबरी करण्याएवठी पात्रता आहे का?

**– ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे**

# मासिक पाळीच्या वेदना त्वरित होतील कमी; या ४ पद्धतीने करा आल्याचे सेवन

मासिक पाळीमध्ये वेदना होणे ही सामान्य बाब आहे. मासिक पाळीदरम्यान स्त्रियांना थोडया फार फरकाने वेदना होतातच. मात्र या वेदना खूप होणे किंवा सारख्या वेदना होणे चिंताजनक असू शकते. काही स्त्रियांना यामुळे आपल्या कामावर लक्ष केंद्रित करता येत नाही. तर काहींना बेडवरच राहावे लागते. मात्र काही घरगुती पदार्थांच्या म दतीने तुम्ही या वेदनांपासून सुटका मिळवू शकता.



असाच पदार्थ आहे ते म्हणजे आलं. आल्याचे बरेच आरोग्य फायदे आहेत. आलं आपल्याला मासिक पाळीमध्ये खूप आराम देऊ शकते. आले प्रोस्टाग्लॅन्डिन्सची पातळी कमी करण्यास मदत करते, हे एक वेदनादायक संप्रेरक आहे. तसेच हे थकव्याशी लढण्यास मदत करते आणि मासिक पाळी अनियमित असल्यास तीदेखील नियमित करू शकते. चला तर मग पाहूया हे आलं कोणकोणत्या पद्धतीने घ्यावं.

चांगल्या आरोग्यासाठी आल्यामध्ये सर्व आवश्यक पौष्टिक घटक असतात. त्यात पोटॅशियम, मँगनीज, तांबे आणि मॅग्नेशियम आढळतात. तसेच त्यात अँटी–बॅक्टेरियल आणि दाहक–विरोधी गुणधर्म आहेत. बर्?याच रोगांमध्ये ते औषधासारखे कार्य करते. आल्याच्या पाण्याद्वारे वजनदेखील कमी केले जाऊ शकते. म्हणून त्याला सुपरफूड म्हणतात.

१०० ग्रॅम आल्यामध्ये कॅलरी – ८०, फॅटस – ०.८ ग्रॅम, सोडियम – १३ मिलीग्राम, पोटॅशियम – ४१५ मिलीग्राम, कार्बोहायड्रेट – १८ ग्रॅम, आहारातील फायबर – २ ग्रॅम, साखर – १.७ ग्रॅम, प्रोटीन – १.८ ग्रॅम.

आल्याचा चहा : हरजिंदगीने दिलेल्या माहितीनुसार, आपण नियमित दुधाचा चहा पितोच. जेव्हा आपण चहा बनवण्यासाठी पाणी आणि चहा पट्टी उकळते. तेव्हाच त्यात आलंदेखील उकळा. नंतर यामध्ये दूध घाला. अशाप्रकारे तुमचा आल्याचा चहा तयार होतो.

आलं तुळशी हर्बल चहा : आल्याचे पातळ काप करा. मग एका पॅनमध्ये पाणी घ्या आणि ते घाला. त्यात तुळशीची पाने घाला. थोडावेळ उकळवा. अशाप्रकारे आलं आणि तुळशीचा हा हर्बल चहा तुम्हाला मासिक पाळीच्या वेदनेतून आराम देईल.

आल्याचा काढा : आल्याचा काढा बनवण्यासाठी पातेल्यात १ कप पाणी घाला. त्यात थोडे आले आणि ओवा घालून काही वेळ उकळवा. नंतर ते गाळून घ्या आणि थोडेसे कोमट असतानाच वापरा.

आल्याचे पाणी : कोमट पाण्यात आलं आणि मध घालून पिणे फायदेशीर ठरू शकते. एक कप पाण्यात थोडेसे आले किसून टाका आणि नंतर ते १० मिनिटे उकळा. नंतर गॅस बंद करा आणि त्यात मध घाला. हे आल्याचे पाणी प्यायल्याने तुम्हाला मासिक पाळीच्या वेदनेपासून अराम मिळेल.

# १६ मे राष्ट्रीय डेंग्यु दिन डंख छोटा.धोका मोठा.! दक्षता घेण्याचे आवाहन

दरवर्षी १६ मे रोजी राष्ट्रीय डेंग्यु डे साजरा केला जातो. त्या अनुषगांने डेंग्युबाबत जनजागृती व्हावी हा उद्देश आहे. दरवर्षी सातत्याने डेंग्यु रुग्णांचे प्रमाण वाढत आहे. जगामध्ये कोट्यावधी लोकांना या रोगाचा संसर्ग होतो. भारतातही हा रोग मोठ्या प्रमाणात आढळून येतो. या रोगामध्ये मृत्यू सुध्दा होतात. त्यामुळेचं डंख छोटा, धोका मोठा असे म्हटले जाते. ग्रामीण शहरी व दाट लोकवस्तीच्या भागात या रोगाचे प्रमाण अधिक आहे. या रोगाची साथउद्रेक पावसाळयात जास्त प्रमाणात होतात.

हा रोग विषाणुजन्य रोग (अरबो व्हायरस) आहे. डेंग्यु विषाणुचे डेंग्यु–१, डेंग्यु–२, डेंग्यु–३ व डेंग्यु–४ असे चार प्रकार आहेत.

प्रसार :– या रोगाचा प्रसार दुषित एडीस इजिप्ती नावाची मादी डास चावलेल्यामुळे निरोगी व्यक्तीला डेंग्यु रोग होतो. डेंग्यु विषाणुयुक्त डास मरेपर्यंत दुषित राहून अनेक व्यक्तींना चावुन या रोगाचा प्रसार करतो. डासाच्या शरीरात डेंग्यु विषाणुची वाढ साधारणत: ८ ते १० दिवसांत पुर्ण होते. हाच अधिशयन काळ असतो.

डासोत्पत्ती स्थाने – या रोगाचे प्रसारक एडिस इजिप्ती डास साठविलेल्या स्वच्छ पाण्यांत अंडी घालतात उदा. रांजण, माठ, कुलर्स, पाण्याचे हौद, घराच्या छतावरील टाकाऊ वस्तु, नारळाच्या कुरवंटया, टायर, इ. मध्ये पैदा होतात. हे डास दिवसा चावतात. या डासांच्या पायांवर काळे पांढरे रिंग असतात. म्हणुन या डासांना टायगर मॉस्क्युटो सुध्दा म्हणतात.डासाचे जिचनचक्र : एडिस इजिप्ती डासाची वाढ चार प्रकारामध्ये होते. उदा. अंडी, अळी,कोष, डास.

आजाराची लक्षणे :–अ) डेंग्यु ताप १) तीव्रताप. २) तिव्र डोके दुखी, स्नायुदुखी, सांधेदुखी, उलटया होणे. ३) दुस–या दिवसापासुन तिव्र डोळे दुखी. ४) अशक्तपणा भुक मंदावणे, ताप कमी जास्त होणे. ५) अंगावर पुरळ येणे.

ब) रक्तस्त्रावयुक्त डेंग्यु ताप (डेंग्यु हिमोरेजिक फिवर) १) डेंग्यु तापाची वरीलप्रमाणे लक्षणे आढळुन येतात. २) त्वचेखाली रक्तस्त्राव होणे. ३) नाकातून रक्तस्त्राव होणे. रक्ताची उलटी होणे. ४) रक्तमिश्रीत किंवा काळसर रंगाची शौचास होणे. पोट दुखणे. ५) रक्तस्त्रावयुक्त डेंग्युताप बहुतांशी १५ वर्षाखालील मुलांना होतो. मोठ्या व्यक्तींनाही होतो.

क) डेंग्यु शॉक सिंड्रोम डेंग्यु मध्ये जेंव्हा रुग्ण बेशुध्द होतो त्याला डेंग्यु शॉक सिंड्रोम असे म्हणतात. यामध्ये मृत्युचे प्रमाण जास्त असते.

रोग निदान :–रक्तजल नमुना तपासणी रक्तजल चाचणी सुक्ष्मजीव शास्त्र विभाग, शासकीय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय (घाटी) छ. संभाजीनगर येथे तपासणी करुन निश्चित रोगनिदान होते.



उपचार :– या आजारावर निश्चित असे उपचार उपलब्ध नाहीत. वैद्यकिय अधिकारी यांच्या सल्लानुसार औषधे व विश्रांती घेणे आवश्यक आहे. अतिशय घाम येणे, वारंवार उलटया होणे, जिभेला कोरड पडणे अशा परिस्थितीत ओ.आर.एस. (मीठ साखर पाणी) द्रावणाचा वापर करावा.

दक्षता : टॅब ॲस्परीन, ब्रुफेन ई औषधी देऊ नयेत. वैद्यकिय अधिकारी यांच्या देखरेखीखाली औषधोपचार घेणे. रक्तस्त्रावयुक्त डेंग्युताप (डेंग्यु हिमोरेजिक फिवर) व डेंग्यु शॉक सिंड्रोम या रुग्णांना तातडीने रुग्णालयात दाखल करणे आवश्यक आहे.

प्रतिबंधात्मक उपाय योजना :–

१) सर्व्हेक्षण :– प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सर्व्हेक्षण अंतर्गत रक्त नमुने व रक्तजल नमुने घेऊन रुग्णांचा शोध घेऊन औषधोपचार करण्यांत येतो. २) डास अळी व डास नियंत्रण डास अळी नियंत्रण ही सर्वात महत्वाची कृती आहे. हिवताप, डेंग्यु व चिकुनगुनिया चे डास स्वच्छ पाण्यावर अंडी घालतात. ३) डासोत्पती स्थाने पावसाळयात साचलेली डबकी, रांजण, हौद, पाण्याच्या टाक्या, कुलर, रिकामे टायर, नारळाच्या करवंट्या, इत्यादी. नष्ट करण्यांत यावेत. ४) डासोत्पती स्थाने नष्ट करण्यासाठी तीन दिवसातुन एकदा पाणी साठे रिकमे करून कोरडा दिवस पाळण्यांत यावा. ५) साचलेली डबके व नाल्या वाहत्या कराव्यात. खड्डे बुजाविण्यांत यावेत. शक्य नसल्यास या पाण्यावर आठवडयातुन एकदा रॉकेल, टाकाऊ ऑईल टाकण्यांत यावे. ६) ॲबेटींग : आरोग्य विभागामार्फत घरातील सांड पाण्याचे रिकामे न करता येणारे पाणीसाठ्यात योग्य प्रमाणात ॲबेटींग केले जाते. ७) म च्छरदाणीचा वापर करण्यांत यावा. ८) जैविक उपाय योजना: डासोत्पती स्थानात गप्पीमासे सोडण्यांत येतात. हे मासे डासांच्या अळया खातात. सर्व आरोग्य संस्थेत गप्पी मासे मोफत मिळतात. ९) किटकनाशक फवारणी: संवेदनशिल भागात डास नियंत्रणासाठी किटकनाशकाची फवारणी पावसाळयात दोनदा केली जाते. याचा प्रभाव अडीच महिने राहतो. फवारणी केल्यानंतर तीन महिने घर सारवु नये. १०) धुरफवारणी :– उद्रेकग्रस्त भागात धुर फवारणी केली जाते. एक आठवडयाच्या अंतराने दुस–यांदा धुरफवारणी केली जाते.

आरोग्य संदेश :–१) घरातील पाणीसाठे तीन दिवसांतुन एकदा रिकामे करुन घासुन पुसून कोरडे करुन घ्यावे.

२) डासांपासुन स्वत:चे रक्षण करण्यांत यावे. याकरिता डास प्रतिबंधात्मक कॉईल, वडया, क्रिम, मच्छरदाणी, संपुर्ण अंगावर कपडे घालणे. ३) आपला परिसर स्वच्छ ठेवा. ४) आरोग्य कर्मचा–यांना सहकार्य करावे.कोरडा दिवस पाळवा तसेच आरोग्य कर्मचारी यांना जनतेने सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. जयश्री भुसारे यांनी केले आहे.

# दयानंद विज्ञान महाविद्यालयात वैज्ञानिक 'एली मेचनिकॉफ' यांची जयंती साजरी

लातूर : येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयात दि.१६ मे २०२४ रोजी जैवतंत्रज्ञान मंचच्या वतीने वैज्ञानिक 'एली मेचनिकॉफ' यांची १७९ वी जयंती साजरी करण्यात आली.वैज्ञानिकांच्या जयंती निमित्त त्यांनी केलेल्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करून अभिवादन करण्याचा हा उपक्रम महाविद्यालय आपले कर्तव्य मानून राबवत आहे.याच निमित्ताने विद्यार्थ्यांना वैज्ञानिकांच्या संशोधकांमुळे प्रेरणा घेऊन विज्ञान व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात कार्य करून स्वतः बरोबरच महाविद्यालयाचेही नावलौकिक करतील असे उद्दिष्ट समोर ठेवून हा उपक्रम दीड वर्षांपासून अविरतपणे सुरू आहे.

कार्यक्रमाची सुरुवात उपप्राचार्य डॉ.सिद्धेश्र्वर बेल्लाळे,कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.भाऊसाहेब सरवदे, पर्यवेक्षिका डॉ.वैशाली पाटील व डॉ.संध्या वाडीकर यांनी वैज्ञानिकाच्या प्रतिमेस वंदन करून केली. प्रा.डॉ.कोमल गोमारे यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना केली.एली इलोय मेचनिकॉफ यांच्याबद्दल इयत्ता अकरावीतील विद्यार्थी पार्थ गोमारे यांनी थोडक्यात माहिती सांगितली.



एली मेचनिकोफ हे रशियन प्राणीशास्त्रज्ञ होते जे रोगप्रतिकारशास्त्रातील त्यांच्या अग्रगण्य संशोधनासाठी प्रसिद्ध होते. त्यांना आणि पॉल एहरलिच यांना प्रतिकारशक्तीवरील त्यांच्या कार्याच्या सन्मानार्थ १९०८ चे शरीरशास्त्र आणि वैद्यकशास्त्रातील नोबेल पारितोषिक संयुक्तपणे देण्यात आले. जन्मजात प्रतिकारशक्तीचे जनक म्हणून सन्मानित, मेचनिकॉफ यांनी १८८२ मध्ये फॅगोसाइटोसिस नावाची प्रतिकारशक्तीची प्रक्रिया आणि त्यासाठी जबाबदार पेशी, ज्याला फागोसाइट, विशेषतः मॅक्रोफेज म्हणतात, शोधून काढले.

प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झालेल्या या कार्यक्रमात कनिष्ठ महाविद्यालयातील प्रा.विजय मांदळे, प्रा.मनीषा बाजपाई, कार्यालयीन अधीक्षक नवनाथ भालेराव,सुदाम सातपुते,प्रा.एम बी.पाटील व प्रा.शैलेश सूर्यवंशी तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी अमोल क्षीरसागर,बाळू चौगुले,श्रीमती सूर्यवंशी व अश्र्विनी धवारे यांची उपस्थिती होती.

## इतिहासात आजचा दिवस

अंतरराष्ट्रीय

१५९० – डेन्मार्कची ॲन स्कॉडलंडच्या राणीपदी.

१६७३ – लुई जोलिये व जॉक मार्केटने मिसिसिपी नदीच्या आसपासच्या प्रदेशांचा शोध घेण्यास सुरुवात केली.

१७७५ – अमेरिकन क्रांती – अमेरिकेने कॅनडाशी व्यापार बंद केला.

१७९२ – न्यू यॉर्क शेरबाजाराची स्थापना.

१८०२ – नेपोलियन बोनापार्टने पोपची राष्ट्रे फ्रांसमध्ये समाविष्ट करुन घेतली.

१८१४ – फ्रांसने मोनॅको ऑस्ट्रियाला दिले.

१८१४ – नॉर्वेने नवीन संविधान अंगिकारले.

१८६५ – आंतरराष्ट्रीय दूरसंचार संघ (आयटीयू) स्थापन झाला.

१९१५ – युनायटेड किंग्डमचे सरकार अल्पमतात येउन कोसळले.

१९४० – दुसरे महायुद्ध – जर्मनीचे सैन्य ब्रसेल्समध्ये शिरले.

१९५४ – अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने ब्राउन वि. टोपेका, कॅन्ससचे शिक्षण मंडळ या खटल्यात एकमताने निर्णय दिला की शाळांमधून वंशभेद करणे असंवैधानिक आहे.

१९७० – थॉर हायरडाल मोरोक्कोहून अटलांटिक समुद्र पार करण्यासाठी रा २ या कागद व वनस्पतींपासून तयार केलेल्या नावेतून निघाला.

१९७४ – लॉस एंजेल्समध्ये पोलिसांनी सिंबायोनीझ मुक्ति सेनेच्या कार्यालयावर हल्ला केला. ६ ठार.

१९७४ – आयर्लंडच्या डब्लिन व मोनाघन शहरांत अतिरेक्यांचे बॉम्बहल्ले. ३३ ठार.

१९८० – विद्यार्थ्यांची निदर्शने रोखण्यासाठी दक्षिण कोरियात लश्करी कायदा लागू.

१९८७ – इराकच्या लढाउ विमानाने अमेरिकेच्या यु.एस. एस. स्टार्क या जहाजावर अस्त्रहल्ला केला. ३७ सैनिक ठार, २१ जखमी.

१९९५ – जॉक शिराक फ्रांसच्या राष्ट्राध्यक्षपदी.

१९९९ – एहूद बराक इस्राईलच्या पंतप्रधानपदी.

२००३ – पाकिस्तानच्या कर्णधार व महान गोलंदाज वसिम अक्रमने निवृत्ती जाहीर केली.

२००७ – न्यूझीलँडच्या वेगवान गोलंदाज शेन बाँडला ऑकलंडमध्ये झालेल्या एका समारंभात वर्षाचा सर्वोत्कृष्ट क्रिकेटपटू तसेच एक दिवसीय सामन्यात वर्षाचा सर्वोत्कृष्ट गोलंदाज म्हणून निवडण्यात आले.

राष्ट्रीय

२००६ – 'लाभाचे पद' विधेयकावर संसदेने शिक्कामोर्तब केले.

२००७ – वर्ष २००६ चा सर्वात्कृष्ट पत्रकार कुमार पार्थसारथी (नवभारत टाइम्स), ज्येष्ठ महिला पत्रकार वैदेही तामण अनुष्ठा, सर्वात्कृष्ट टिव्ही पत्रकार इंद्रजीत सिंह (एनडीटीव्ही), हिमांशु राय सिने पत्रकार सन्मान शरद रॉय (मायापुरी), सर्वात्कृष्ट युवा पत्रकार अरुण कुमार कमल व पत्रकार मित्र सन्मान वाय.एम. माणियार यांना प्रदान करण्यात आला. ए लिजेंड पर्सनॅलिटी ऑफ फिल्म इंडस्ट्रीचा बहुमान मनोजकुमार (भारतकुमार) यांना प्रदान करण्यात आला.

२००८ – विदर्भातील पारंपरिक शेतकरी कुटुंबातील मुलगा गुणवत्तेच्या जोरावर ''आयआयटी' दिल्लीतून 'एमटेक' झाला, लष्कराच्या संशोधन विभागात त्याची निवड झाली. मात्र, मन स्वस्थ बसू देईना. त्यातूनच गेली पाच वर्षे कष्ट घेतले, या कष्टाचे अखेर चीज झाले आणि पारधी समाजातील सज्जनसिंग रामसिंग चव्हाण पहिला ''आयएएस' झाला.

२००८ – बंगळुरुच्या बायोटेक शाखेत शिक्षण घेणाऱ्या म ल्लिकार्जुन रेड्डी नावाच्या एका विद्यार्थ्याने लाकडाच्या ६६ मिमी दंतकोरणी पासून २४ काड्यांच्या चेनची निर्मीती केली. हा त्याचा विश्वविक्रम ठरला व त्याची नोंद गिनीज बुकात करण्यात आली.

## राशी भविष्य १७ मे २०२४

मेष : शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा:पश्चिम

कामकाजामध्ये वाढ होईल अनकुल स्थिती राहणार आहे. वेळेचा चांगला उपयोग करून आपल्या आशा आकांक्षा पूर्ण करण्याच्या दृष्टीने कामकाजाला सुरूवात करा. विचारपूर्वक निर्णय घ्या.

वृषभ: शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा: उत्तर

कौटुंबिक समस्यामध्ये लक्ष राहणार नाही. अनिश्चितेमुळे वैचारिक धाडसामध्ये कमतरता राहील. व्यापारात कोणावरही विश्वास दाखवू नका. कर्ज घेण्याची वेळ येऊ शकते.

मिथुन: शुभ रंग काळा, शुभ दिशा:पश्चिम

वाद विवाद संपुष्टात येतील. नौकरी करणाऱ्यांना मनासारखी बढती, बदली होण्याची शक्यता आहे. सामाजिक कार्य करीत असल्यामुळे मान सन्मान मिळेल.

कर्क : शुभ रंग:जांभळा, शुभ दिशा: पश्चिम

रचनात्मक कामात यश मिळेल. आर्थिक योग उत्तम आहे. कुटुंबातील व्यत्तिंच्ये सहकार्य घ्या. प्रभावी वातावरणाचा उपयोग होईल. अती उत्साहीपणा दाखवू नका.

सिंह: शुभ रंग: लाल, शुभ दिशा : पूर्व

व्यावसायिक योजना गुप्त ठेवा. देण्या घेण्याच्या व्यवहारात सावधपणा ठेवा. मुलांच्या बाबतीत काळजी वाटेल. देवाधम र्विरील विश्वास वाढेल.

कन्या: शुभ रंग : गुलाबी, शुभ दिशा:पूर्व

बौद्धीक अडचणी दूर होतील. प्रगतीचे मार्ग मोकळे होतील. फायदेशीर प्रवास होण्याची शक्यता आहे. कुटुंबातील वयस्कर व्यक्तींच्या प्रकृतीची काळजी घ्या. व्यावसायामधील वादापासून दूर रहा.

तुळ: शुभ रंग : केसरी, शुभ दिशा: उत्तर

आपले प्रयत्न आज सफल होतील. व्यापारात योग्यवेळी घेतलेला निर्णय फायदेशीर राहील. शिक्षणात यश मिळेल. वेळेचा दुरूपयोग करू नका.

वृश्चिक: शुभ रंग: निळा, शुभ दिशा: दक्षिण

नातेवाईकांशी असलेल्या संबंधात मर्यादा राखा. व्यापारात नवीन संधी मिळतील. आर्थिक उत्पन्नात वाढ होईल. कौटुंबिक समस्या दूर होईल.

धनु: शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा: दक्षिण

मुलांच्या प्रगतीमुळे मन प्रसन्न राहील. आर्थिक आवक चांगली राहील. वाचनाची गोडी वाढेल. राहण्यासाठी घराची चिंता दूर होईल.

मकर : शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा: पश्चिम

कौटुंबिक समस्या आणि स्थावर मालमत्ता या संबंधीतील समस्या दूर होतील. समाजात प्रतिष्ठा मिळाल्याने आनंदी रहाल. कोणाचाही द्वेष करू नका.

कुंभ: शुभ रंग: काळा: शुभ दिशा:पश्चिम

व्यवसायामध्ये अनकूल अशी सफलता मिळेल. येणाऱ्या खर्चामुळे चिंतेत रहाल. खर्चामध्ये वाढ होईल. कौटुंबिक वातावरण चांगले राहील.

मीन : शुभ रंग: लाल, शुभ दिशा: उत्तर

भांडण, वादविवादामुळे मानसिक ताण वाढेल. आर्थिक स्थिती मध्यम राहील. पारिवारीक सहकार्याने कामात यश मि ळेल.

१७ मे ला जन्मलेल्या लोकांचा भविष्य

स्वभाव : तुमच्या जन्मतारखेवर सुर्य, नेपच्यून, शनी व शुक्राचा प्रभाव आहे.

### ''राज ठाकरेंचे महाराष्ट्राच्या राजकारणातील स्थान काय?'', शरद पवारांचा टोला, 'त्या' टीकेवर दोन वाक्यात प्रत्युत्तर

मुंबई : राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष फुटून दोन गट पडल्यापासून या दोन्ही गटांमधील नेते सातत्याने एकमेकांवर टीका-टिप्पणी करत आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवार (राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख) हे थेट शरद पवारांवर (राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार या पक्षाचे प्रमुख) हल्लाबोल करत आहेत. महायुतीतील इतर नेतेही शरद पवारांवर टीका करत असल्याचं पाहायला मिळत आहे. दरम्यान, महायुतीला पाठिंबा देणारे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे हे सध्या महायुतीमधील पक्षांच्या आणि त्यांच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी ठिकठिकाणी सभा घेत आहेत. राज ठाकरे यांनी दोन दिवसांपूर्वी महायुतीचे कल्याण लोकसभेचे उमेदवार श्रीकांत शिंदे यांच्या प्रचारार्थ शिवसेनेच्या शिंदे गटाने आयोजित केलेल्या प्रचारसभेला हजेरी लावली. राज यांनी कल्याणमधील सभेत बोलताना शरद पवारांना टोला लगावला होता.

राज ठाकरे म्हणाले होते, शरद पवारांनी याआधी अनेक राजकीय पक्ष फोडण्याचं काम केलं आहे. त्यामुळे आता त्यांचा पक्षदेखील फुटला आहे. राज ठाकरे यांच्या या टीकेला शरद पवारांनी उत्तर दिलं आहे. शरद पवार यांनी काही वेळापूर्वी मुंबईत प्रसारमाध्यमांशी बातचीत केली. यावेळी त्यांना राज ठाकरेंनी केलेल्या टीकेबद्दल विचारण्यात आलं. त्यावर शरद पवार म्हणाले, राज ठाकरे नक्की काय म्हणाले ते मला माहिती नाही. राज ठाकरे यांचं महाराष्ट्राच्या राजकारणात नेमकं स्थान काय आहे हे देखील मला माहिती नाही. मी असं ऐकलं होतं की त्यांचा नाशिक मध्ये स्ट्राँग बेस आहे (नाशिकमध्ये त्यांचा पक्ष मजबूत स्थितीत आहे). मात्र मला हल्ली नाशिकमध्ये ना ते दिसतात ना त्यांचा पक्ष.

एका वृत्तपत्राला दिलेल्या मुलाखतीत शरद पवार असं म्हणाले होते की लोकसभा निवडणुकीनंतर अनेक छोटे पक्ष किंवा प्रादेशिक पक्ष काँग्रेसमध्ये विलीन होऊ शकतात. शरद पवारांच्या या वक्तव्यावर वेगवेगळ्या राजकीय प्रतिक्रिया येऊ लागल्या. अशातच भाजपा नेत्यांनी दावे केले की लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर कदाचित शरद पवारांचा पक्ष आणि उद्धव ठाकरे यांचा पक्ष (शिवसेना उबाठा) काँग्रेसमध्ये विलीन होईल. भाजपा नेत्यांच्या या दाव्यांनंतर शिवसेनेच्या ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी या दोन्ही दाव्यांवर प्रतिक्रिया दिली. उद्धव ठाकरे म्हणाले, आम्ही इतकी वर्षे भाजपाबरोबर होतो. इतक्या वर्षांमध्ये आम्ही कधी भाजपात विलीन झालो नाही. मग आता आम्ही काँग्रेसमध्ये कसे काय विलीन होऊ? उद्धव ठाकरे यांच्या या वक्तव्यावर शरद पवारांनी आज (१६ मे) प्रतिक्रिया दिली.

शरद पवार म्हणाले, मी छोट्या पक्षांबद्दल बोललो होतो. मी काही शिवसेनेबद्दल बोललो नाही. शिवसेना हा खूप मोठा पक्ष आहे. शिवसेना आज विधानसभेत भाजपानंतरचा दुसरा सर्वात मोठा पक्ष आहे. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत त्यांच्या पक्षाचे ५६ आमदार निवडून आले होते. तसेच आमचे ५४ आमदार होते. काँग्रेसचे ४० ते ४५ आमदार होते. शिवसेना ही विधानसभेमधील एक मोठी शक्ती आहे. त्यामुळे मी त्यांच्या पक्षाबद्दल बोललोच नाही.

### तब्बल ६३ तासांनंतर आटोपलं होर्डिंग दुर्घटनेचे बचावकार्य

मुंबई : मुंबई आणि इतर परिसरात अवघ्या काही क्षणांसाठी पडलेल्या पावसाने जनजीवन विस्कळीत केले. घाटकोपरमधील महाकाय होर्डिंग या वादळी वाऱ्यामुळे पेट्रोल पंपावर पडले. या दुर्घटनेत एकूण १६ जणांचा मृत्यू झाला असून अनेक जण जखमी झाले आहेत. गेल्या तीन दिवसांपासून सेन्सर आणि श्वान पथक, ंीइच्या मदतीने होर्डिंगच्या ढिगाऱ्याखाली कोणी अडकले आहे का याचा शोध घेतला जात होता. आता तब्बल ६३ तासानंतर या दुर्घटनेचे बचावकार्य अखेर पुर्ण झालं असल्याची माहिती मुंबई पालिकेने दिली.

मुंबई पालिकेचे आयुक्त भूषण गगराणी यांनी दिलेल्या माहितीनुसार, घाटकोपरमधील होर्डिंग मृत्यूकांडातील बचावकार्य पुर्ण झालं आहे. या दुर्घटनेत १६ दणांचा दुर्दैवी मृत्यू झाला तर ७५ जन जखमी झाले आहेत. या बचावकार्यात मुंबई महानगरपालिका, मुंबई पोलीस, एमएमआरडीए, एनडीआरएफ, महानगर गॅस या सर्व यंत्रणांनी समन्वय साधत बचावकार्य पुर्ण केलं. दुर्घटनेच्या ठिकाणी संपुर्ण तपासणी करण्यात आली असून यामध्ये अन्य कोणतीही व्यक्ती अडकलेली नाही. आता होर्डिंगचा मलबा हटवण्याचे काम सुरू आहे. या दुर्घटनेत मृत्यू झालेल्यांच्या कुंटुबीयांना त्वरीत मदत दिली जाईल. पालिकेने मुंबईतील अनाधिकृत होर्डिंग बाबतीत कारवाया हाती घेतल्या आहेत.

# रसायनाद्वारे पिकवलेल्या आंब्यांनी ग्राहकांचा जीव धोक्यात अन्न व औषध प्रशासन विभागाने कारवाई करावी अ.भा.ग्राहक पंचायतीची मागणी

लातूर/प्रतिनिधी : ग्राहकांची मागणी लक्षात घेता सध्या बाजारपेठेमध्ये रसायनाद्वारे पिकवलेल्या आंब्यांची विक्री मोठ्या प्रमाणात केली जात आहे अन्न व औषध प्रशासनाने ही विक्री थांबून संबंधित विक्रेत्यांवर कारवाई करावी अशी मागणी अखिल भारतीय ग्राहक पंचायतीच्या वतीने करण्यात आली आहे. नागरिकांनीही आंबे घेताना ते नैसर्गिक रित्या पिकवलेले आहेत की कृत्रिम हे पहावे,असे आवाहनही ग्राहक पंचायतीने केले आहे.

सध्या मोठ्या प्रमाणात आंबा बाजारात आला आहे.ग्राहकांनी आंबा विकत घेताना तो नैसर्गिक रित्या पिकविलेला आहे की कृत्रिम याची ओळख करून किंवा पारखून विकत घ्यावा. कांही व्यापारी पटकन आंबा विक्री करून जास्त नफा कमविण्यासाठी इथेफॉन नावाच्या घातक रासायनिक द्रव्याचा वापर करून आंबा पिकवतात असे लक्षात येत आहे.

हे रसायन आरोग्यास घातक आहे.हे रसायन आंबा पिकविण्यासाठी वापरण्यावर एफडीए (ऋऊ-) ने कार्यवाही करावी अशी मागणी अखिल भारतीय ग्राहक पंचायत जिल्हा शाखा लातूरच्या वतीने जिल्हाध्यक्ष दत्तात्रय मिरकले पाटील यांनी केली आहे.

ग्राहकांनी आंबा विकत घेताना त्याची पाहणी करावी.हातात घेतला की तो उबदार लागतो की नाही ते पहावे.आंबा घेताना तो वजनदार असला पाहिजे. रासायनिक प्रक्रिया करून पिकविलेला आंबा वजनाने हलका असतो. देठाचा थोडा भाग असलेला आंबा खरेदी करावा.त्या देठावर पांढरी बुरशी दिसली किंवा छिद्र दिसले तर तो आंबा विकत घेऊ नये.नैसर्गिक रित्या पिकवलेल्या आंब्याला छान सुगंध येतो तसेच तो केसरी रंगाचा दिसतो. त्यामुळे विकत घेताना आंब्याचा रंग आणि वास या दोन्ही गोष्टींना प्राधान्य द्यावे. जास्त डागाळलेला आंबा विकत घेऊ नये .

पाण्याच्या टबमध्ये, भांड्यात आंबा टाकला असता नैसर्गिक रित्या पिकवलेले आंबे पाण्याच्या तळाशी जातील पण कृत्रिम पिकवलेले आंबे तरंगतात. कोकण हापूस आंब्याला जी.आय.टॅग दिला आहे काय ? ते पाहून घ्यावे. ग्राहकांनी थेट शेतकऱ्यांच्या शेतावर जाऊन हिरवे आंबे खरेदी करावेत आणि घरी पिकवावेत असा सल्ला अखिल भारतीय ग्राहक पंचायतीच्या वतीने देण्यात आला आहे.

इथेफॉन वापरून पिकविलेला आंबा लहान मुलांना खाण्यासाठी दिला तर पोटाचे विकार, डायरिया, डिहायड्रेशन, डोके दुखणे,लक्षात न रहाणे आणि चक्कर येणे असे विविध विकार होऊ शकतात असे तज्ञांचे म्हणणे आहे.

रासायनिक प्रक्रियेने पिकवलेले आंबे विकत असताना एखादी व्यक्ती आढळल्यास गुप्तपणे अन्न व औषध प्रशासन विभाग लातूर आणि ईमेल वर अखिल भारतीय ग्राहक पंचायत जिल्हा शाखेच्या abgplaturgmail.com या मेलवर किंवा थेट FDA च्या वेबसाईटवर तक्रार नोंदवावी,असे आवाहनही अखिल भारतीय ग्राहक पंचायतीच्या वतीने जिल्हाध्यक्ष दत्तात्रय मिरकले पाटील यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

# काँग्रेसने मागासवर्गीयांच्या आरक्षणाला कायमच विरोध केला, भाजपा ओबीसी मोर्चा राष्ट्रीय अध्यक्ष के. लक्ष्मण यांचा हल्लाबोल




मुंबई : मोदी सरकारच्या १० वर्षांतील गरीब कल्याण योजनांच्या यशामुळे काँग्रेसकडे प्रचारासाठी मुद्देच नसल्याने आरक्षण आणि संविधानाच्या मुद्द्यावर काँग्रेसकडून मतदारांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न चालू आहे, असा आरोप भारतीय जनता पार्टी ओबीसी मोर्चा राष्ट्रीय अध्यक्ष के. लक्ष्मण यांनी गुरुवारी केला. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन, भाजपा मुंबई ओबीसी मोर्चाचे अध्यक्ष नरेंद्र गावकर यावेळी उपस्थित होते. मागासवर्गीयांना आरक्षण देण्यास पंडित नेहरू, इंदिरा गांधी आणि राजीव गांधी यांनी कसा विरोध केला, याचे दाखले देत श्री. के लक्ष्मण यांनी काँग्रेसवर जोरदार हल्ला चढविला. मोदी सरकारने मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी आखलेल्या योजनांमुळे देशातील शोषित, वंचित समाज भारतीय जनता पार्टीच्या मागे उभा राहिला आहे, असेही त्यांनी सांगितले .

श्री. के लक्ष्मण म्हणाले की, ओबीसींच्या विरोधात असलेल्या काँग्रेसने आपले राजकीय हेतू साध्य करण्यासाठी जातीय विभाजनाचे राजकारण सुरू केले आहे. काँग्रेसने कधीही ओबीसींना मानसन्मान दिला नाही, त्यांना आरक्षण दिले नाही. आता निवडणुकांच्या पार्श्र्वभूमीवर जातीय विभाजनाचे राजकारण करत आहे. १९६१ मध्ये जवाहरलाल नेहरू यांनी पंतप्रधान असताना मागासवर्गीयांना आरक्षण देण्यास आपला विरोध असल्याबाबत त्यावेळच्या मुख्यमंत्र्यांना पाठविलेल्या पत्रातील उतारा श्री. के लक्ष्मण यांनी वाचून दाखविला. ''मला कोणतेही आरक्षण आवडत नाही, विशेषतः नोकरीत आरक्षण मान्य नाही. अकार्यक्षमतेला चालना देणाऱ्या अशा कोणत्याही पावलाच्या मी विरोधात आहे. एससी, एसटी, ओबीसींना नोकऱ्यांमध्ये आरक्षण दिले तर सरकारी कामाचा दर्जा घसरेल असे म्हणत नेहरूंनी ओबीसींचा अपमान केला होता असेही श्री. के लक्ष्मण यांनी नमूद केले. १९५५ मध्ये कालेलकर आयोगाच्या मागासवर्गीयांच्या आरक्षणाच्या शिफारशींवर नेहरूंच्या राजवटीत संसदेत चर्चाही होऊ दिली नाही. १९८० साली मंडल आयोगाच्या शिफारशी सादर झाल्या होत्या. मात्र काँग्रेस सरकारने १९९० पर्यंत या शिफारशींची अंमलबजावणी केली नाही. भाजपाच्या पाठिंब्यावर सत्तेत आलेल्या व्ही. पी.सिंह सरकारने मंडल आयोगाच्या शिफारशी लागू करण्याचा निर्णय घेतल्यानंतर राजीव गांधी यांनी या आरक्षणाला संसदेत कडाडून विरोध केला होता, याचे स्मरणही श्री. के लक्ष्मण यांनी करून दिले. डॉ.मनमोहन सिंग सरकार सत्तेत असताना सच्चर समितीचा हवाला देत काँग्रेसने देशातील मुस्लिमांची स्थिती दलितांपेक्षा अधिक हलाखीची आहे असे चुकीचे चित्र रंगवून मतपेढीसाठी मुस्लिमांना झुकते माप दिले होते. घटनाकार डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा धार्मिक आरक्षणाला विरोध असताना काँग्रेसने त्यांच्या विचारांचा मान कधीच राखला नाही. डॉ. आंबेडकरांना लोकसभा निवडणुकीत काँग्रेसनेच पराभूत केले, असेही श्री. के लक्ष्मण यांनी सांगितले.१९८१ मध्ये एससी, एसटी आणि ओबीसींचे आरक्षण हटवण्यासाठी अलिगढ मुस्लिम विद्यापीठ सुधारणा कायदा' काँग्रेसनेच आणला. २००९ च्या जाहीरनाम्यात नोक-या आणि शिक्षणात मुस्लिमांना राष्ट्रीय स्तरावर आरक्षण देण्याचे वचन देण्यात आले होते. ओबीसी आरक्षणामध्येच मुस्लिमांसाठी उप कोटा असावा अशी काँग्रेसची सुप्त इच्छा होती. कर्नाटकात देखील रातोरात मुस्लिमांना ओबीसी बनवून अनुसूचित समाजासाठीचे आरक्षण मुस्लिमांना देण्याचे षडयंत्र काँग्रेसचे होते. देशभरात हेच मॉडेल राबवायची काँग्रेस ची योजना आहे, असेही ते म्हणाले.

भाजपा-एनडीए ने ओबीसींचा यथोचित सन्मान राखत मंत्रिमंडळात २७ ओबीसी, १२ अनुसूचित जाती, ८ अनुसूचित जनजातीच्या मंत्र्यांना स्थान दिले. दलित समाजाच्या व्यक्तीला आणि आदिवासी महिलेला राष्ट्रपतीपदी विराजमान केले. भावी पिढ्यांच्या उज्वल भविष्यासाठी समस्त ओबीसी समाजाने एकजूट होत भाजपा-एनडीए ला साथ द्यावी असे आवाहनही त्यांनी केले.

# उच्च शिक्षण सहसंचालक डॉ. किरणकुमार बोंदर यांचा सत्कार



लातूर : श्री महात्मा बसवेश्र्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालय लातूरचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांनी विभागीय शिक्षण सहसंचालक कार्यालय, नांदेड विभाग, नांदेड येथील शिक्षण सहसंचाल डॉ. किरणकुमार बोंदर यांचा शाल, महात्मा बसवेश्र्वर प्रतिमा, स्मृतिचिन्ह आणि पुष्पगुच्छ देऊन यथोचित सत्कार केला.

यावेळी कॅप्टन डॉ. बाळासाहेब गोडबोले, डॉ. दीपक चाटे आणि संदीप जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांनी महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालयाची स्थापना सं १९७०ला झाली असून आज ५४ वर्ष झालेले आहे. हे महाविद्यालय मराठवाड्यातील कला, वाणिज्य, विज्ञान, व्होकेशनल, समाजकार्य आणि बीसीए अशा एकूण सहा शाखा चालवणारे आहे. समाजशास्त्र, इतिहास, भूगोल, राज्यशास्त्र, तत्त्वज्ञान आणि गणित असे एकूण सहा पदव्युत्तर विभाग असून तत्त्वज्ञान, समाजशास्त्र आणि भूगोल या विषयाचे संशोधन केंद्रे आहे. महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालयांमध्ये स्थापनेपासून ते आजतागायत महात्मा बसवेश्र्वर व्याख्यानमाला, असा मी घडलो.... प्रबोधनपर कार्यक्रम अशा सामाजिक उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीवजागृती निर्माण करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. क्रीडा, राष्ट्रीय छात्र सेना, राष्ट्रीय सेवा योजना आणि कौशल्याधिष्ठित अभ्यासक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना देशाचा एक उत्कृष्ट नागरिक बनविण्याचा प्रयत्न केला जातो असेही ते म्हणाले.

यावेळी बोलताना डॉ. किरणकुमार बोंदर म्हणाले की, महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालय हे मराठवाड्यातील शैक्षणिकदृष्ट्या समृद्ध असलेले महाविद्यालय आहे. या महाविद्यालयाला नॅकने अ दर्जा प्रदान केलेला आहे. येणाऱ्या काळामध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०ची प्रभावी अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संस्था पदाधिकारी, प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी यांची आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात विद्यार्थी केंद्रित असून यामध्ये विद्यार्थ्याला अधिकाधिक कौशल्ययुक्त निर्माण करून त्याने स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी प्रयत्नशील असण्यासाठी सातत्याने विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या धोरणामध्ये सैद्धांतिक ज्ञानासोबत प्रात्यक्षिक ज्ञानाला अधिक महत्त्व दिले असल्याचे त्यांनी सांगितले.

डॉ. बाळासाहेब गोडबोले यांनी सर्वांचे आभार मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी योगेश मोदी यांनी परिश्रम घेतले.

### दिव्यांग सशक्तीकरणासाठी मोदींच्या हमीवर विश्र्वास

मुंबई : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारच्या




निर्णयांमुळे दिव्यांगांच्या सशक्तीकरणासाठी मोठी मदत झाली आहे. दिव्यांगांसाठी घेतलेल्या निर्णयांबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी नमो दिव्यांग अभियान भारतने या निवडणुकीत भारतीय जनता पार्टी आणि महायुती उमेदवारांना आपला पाठिंबा जाहीर केला आहे, अशी माहिती नमो दिव्यांग अभियान भारतचे राष्ट्रीय समन्वयक विकास शर्मा यांनी गुरुवारी दिली. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत श्री.शर्मा बोलत होते. यावेळी भाजपा प्रदेश माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन, निरंजन जाधव उपस्थित होते. या अभियानाचे सदस्य असलेले सर्व श्रेणीतील दिव्यांग बंधूभगिनी या निवडणुकीत भाजपा-एनडीए, महायुतीच्या उमेदवारांना समर्थन देतील अशी ग्वाहीही श्री.शर्मा यांनी दिली.

दिव्यांगांच्या उन्नतीसाठी संबंधित कायद्यामध्ये संशोधन करून त्यात बदल करण्याची मागणी अनेकदा करूनही त्याकडे आधीच्या सरकारांनी दुर्लक्ष केले. मात्र दिव्यांगांच्या न्याय्य मागण्यांची दखल घेत भाजपा-एनडीए सरकारने दिव्यांगांच्या सशक्तीकरणासाठी अनेक पावले उचलली. २०१६ साली दिव्यांगजन अधिकार अधिनियम पारित करून मोदी सरकारने अनेक वर्षांपासूनची दिव्यांगवर्गाची मागणी पूर्ण केली. अपंग, विकलांग या नकारात्मक संबोधनाऐवजी 'दिव्यांग' या सकारात्मक शब्दाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या वर्गाला सन्मान दिला. हीन, दीन, दया या श्रेणीतून या वर्गाला बाहेर काढून समाजाच्या मुख्य प्रवाहात आणले असे श्री.शर्मा म्हणाले. राजकीय पक्षांच्या जाहीरनाम्यात दिव्यांगांना स्थानच नसे. मात्र भाजपाच्या २०१४, २०१९ आणि २०२४ च्या जाहीरनाम्यांमध्ये दिव्यांगांच्या उन्नतीसाठी आणि त्यांना प्रमुख प्रवाहात आणण्यासाठी अनेक आश्र्वासने दिली. या आश्र्वासनांची गेल्या १० वर्षांत पूर्तताही केली. या निवडणुकीसाठीच्या संकल्पपात्रात भारतीय जनता पार्टीने दिव्यांगांना आवश्यक तांत्रिक उपकरणांच्या आधुनिकीकरणासाठी विशेष प्रयत्न करण्याचे आश्र्वासन दिले आहे, याकडे श्री.शर्मा यांनी लक्ष वेधले. पंतप्रधान दिव्यांग आवास योजना २०२४ द्वारे दिव्यांगांच्या विशिष्ट गरजांनुसार परवडणारी आणि सुगम्य घरे बांधली जाणार आहेत. या निवडणुकीत राजस्थानमधील चुरू लोकसभा मतदारसंघातून दिव्यांग असलेल्या देवेंद्र झांझरीया यांना उमेदवारी देऊन पंतप्रधान मोदी यांनी राजकारणात नवा अध्याय लिहीला असल्याचे श्री.शर्मा यांनी नमूद केले. मोदी सरकारने दिलेल्या प्रोत्साहन आणि पाठिंब्यामुळेच दिव्यांग खेळाडू आज विविध आंतरराष्ट्रीय क्रिडा स्पर्धांमध्ये नेत्रदिपक कामगिरी करत आहेत असेही ते म्हणाले.

एनडीए सरकार सत्तेत आल्यास दिव्यांगांच्या कल्याणासाठी झटणा-या नमो दिव्यांग अभियान भारतला ही त्यामुळे बळ मिळेल. दिव्यांग वर्गाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी मानवी दृष्टीकोनातून अनेक प्रयत्न आणि उपाययोजना मोदी सरकारने केल्या आहेत आणि यापुढेही करतील हा विश्र्वास दिव्यांगवर्गाला आहे. मजबूत राष्ट्र निर्माणासाठी, दिव्यांगवर्गाच्या सशक्तीकरणासाठी दिव्यांग बंधुभगिनींनी अधिकाधिक संख्येंने घराबाहेर पडून महायुती आणि भाजपा-एनडीए च्या उमेदवारांना विजयी करावे असे आवाहनही श्री.शर्मा यांनी केले.

दिव्यांग मतदारांनी मतदानाचा हक्क बजावावा, तसेच मतदान केंद्रावर पोहोचून त्यांना मतदान करणे सोपे व्हावे यासाठी निवडणूक आयोगासोबतच नमो दिव्यांग अभियान भारत चे सर्व कार्यकर्ते मदत करतील असेही ते म्हणाले.

### एमडीए फाऊंडेशन द्वारा संचलित एमडीए रॉयल इंटरनॅशनल स्कुलचा १०० टक्के निकाल

लातूर /प्रतिनिधी :सीबीएसई बोर्डाच्या वतीने घेण्यात आलेल्या इयत्ता दहावीचा निकाल जाहीर करण्यात आला असून या परीक्षेत कोळपा येथील एमडीए फाऊंडेशन द्वारा संचलित एमडीए रॉयल इंटरनॅशनल स्कूलचा निकाल शंभर टक्के लागला आहे.

या शाळेतील विद्यार्थी प्रथमच या परीक्षेस सामोरे गेले होते. संस्थेची ही प्रथम बॅच असल्याने सर्वांच्याच नजरा निकालाकडे लागल्या होत्या. या परीक्षेत फाउंडेशन मधून कु.माहेश्र्वरी पाटील ही ८५ टक्के गुण घेवून प्रथम आली.कु.विद्या गवारे हिने ८४.०२ गवारे टक्के गुण घेत द्वितीय क्रमांक पटकावला.मुजीब रियाजौद्दीन शेख याने ८२.०८ टक्के गुण घेत तिसरा क्रमांक मिळवला. आवेज माजिद शेख याला ८२ टक्के,कु.अपूर्वा बेलकुंदे या विद्यार्थीनीने ८१.०८ टक्के गुण घेत भरीव यश संपादन केले.

एमडीए फाऊंडेशन संस्थेचा इयत्ता दहावी परीक्षेचा निकाल १०० टक्के लागल्याने विद्यार्थी, पालक व एमडीए फाऊंडेशनचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे. सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे संचालक दिनेश आंबेकर, यशवंत आंबेकर,प्राचार्या श्रीमती स्वाती वाडी तसेच सर्व शिक्षक व कर्मचार्यांनी अभिनंदन केले आहे.

### महाराष्ट्रात पुन्हा होणार राजकीय भूकंप; उबाठा आणि शरद पवार गट फूटणार!

मुंबई : देशभरात निवडणुकीच्या रणधुमाळीत लोकसभा निवडणुकीच्या शेवटच्या टप्प्यात प्रचाराचा रंग आणखी चढू लागला आहे. सत्ताधारी आणि विरोधक एकमेकांवर आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झाडण्याची एकही संधी सोडत नाहीत. सध्या निवडणुकीचे पाचव्या आणि अंतिम टप्प्यातील मतदान २० मे रोजी पार पडत आहे. यानंतर राजकीय वर्तुळाला ४ जूनच्या निकालाचे वेध लागली. मात्र, त्यापूर्वी भाजपाचे नेते मोहित कंबोज यांनी एक खळबळजनक दावा केला आहे. ट्विटच्याआधारे मोहित कंबोज यांनी महाराष्ट्रात आणखी एक राजकीय भूकंप होण्याचे संकेत दिले आहेत. त्यांच्या या ट्विटमुळे राजकीय वर्तुळात चर्चेचे उधाण आले आहे. मोहित कंबोज यांनी आपल्या ट्विटमध्ये म्हटले आहे की, ४ जून रोजी लोकसभेचा निकाल जाहीर झाल्यानंतर उद्धव ठाकरे यांची शिवसेना आणि शरद पवार यांच्या राष्ट्रवादीत आणखी एक फूट पडणार आहे. दोन्ही पक्षांमधून आमदार, नेते आणि कार्यकर्ते राजीनामा देऊन बाहेर पडतील. हे सर्वजण सध्या इतर पक्षांच्या संपर्कात आहेत, असा दावा मोहित कंबोज यांनी केला आहे. त्यामुळे लोकसभा निवडणुकीनंतर खरोखरच ठाकरे गट आणि शरद पवार गटातील उर्वरित आमदार उद्धव ठाकरे आणि शरद पवारांची साथ सोडून सत्ताधारी गटात सामील होणार का, हे आगामी काळात स्पष्ट होईल, असे मोहित कंबोज यांनी सांगितले.

हे पत्रक, मालक, संपादक, प्रकाशक रघुनाथ बनसोडे यांनी मुद्रक महेश मोतीराम राठोड यांनी मयूर ऑफसेट प्रिंटर्स, मेन रोड, मित्र नगर, लातूर, जि.लातूर - ४१३ ५१२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक लातूर प्रभात, पवन कॉलनी, कृपासदन शाळेजवळ, लातूर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - रघुनाथ वाघोजी बनसोडे, मो.८८३०२५०६४५
(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकाची जबाबदारी) RNI No.: - MAHMAR/2017/72894